❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३२० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ऐतिहासिक दस्तऐवजांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाचे

अमित शाह यांच्या हस्ते लोकार्पण



■ पुणे (दै. संध्या)

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाचे लोकार्पण केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुरकुंबी इतिहास उपक्रमाचे नरेंद्र मुरकुंबी, मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, सचिव पांडुरंग बलकवडे, कोषाध्यक्ष नंदकुमार निकम, उपस्थित होते. भारत इतिहास संशोधक मंडळ गेल्या ११६ वर्षांपासून इतिहास संशोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. मंडळाकडे जतन केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या माध्यमातून मराठ्यांचा गौरवशाली इतिहास जगासमोर आणण्याच्या उद्देशाने हा डिजिटायझेशन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या उपस्थितीत २०२१ मध्ये या प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला होता. त्यातील पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले. या प्रकल्पामुळे www.bismarchives.in या संकेतस्थळावर दुर्मिळ ऐतिहासिक कागदपत्रे तसेच अमूल्य वस्तूंची सचित्र माहिती उपलब्ध होणार आहे. मंडळाकडे सुमारे तीन लाख कागदपत्रे असून, त्यांची सुमारे साडेसहा लाख पृष्ठप्रतिमा (इमेजेस) टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात सुमारे १० हजार ऐतिहासिक कागदपत्रे संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहेत. यामध्ये बखरी, मुघल फर्माने, हस्तलिखिते, ताम्रपट, चित्रे, नकाशे, शिल्पे, शस्त्रे, शिलालेख, भूमिपत्रे आणि दुर्मिळ ग्रंथांचा समावेश आहे. या माध्यमातून भारतीय इतिहासातील दुर्मिळ आणि महत्वपूर्ण माहिती जागतिक स्तरावर अभ्यासक, संशोधक आणि इतिहासप्रेमींसाठी उपलब्ध होणार असल्याचे मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत यांनी सांगितले. या डिजिटायझेशन प्रकल्पाचे काम चिन्मय भंडारी आणि मिथिलेश कुळकर्णी यांच्या न्यानसा कंपनीने माईंडस्केप हबच्या सहकार्याने पूर्ण केले आहे. प्रकल्पासाठी मुरकुंबी इतिहास उपक्रम आणि भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर यांचेही सहकार्य लाभले आहे.

भंडाऱ्यात अल्पवयीन मुलींना रात्री उशिरा बसमधून उतरवलं

वाहक चालकाचे निलंबन, परिवहनमंत्र्यांचा इशारा

■ मुंबई (दै. संध्या)

सर्वसामान्यांच्या प्रवाशांची हक्काचा लाल परी, गावखेड्यातील माता-भगिनींच्या प्रवासांचे हक्काचं वाहन म्हणून ज्या एसटीकडे पाहिलं जातं, त्याच एसटीमधील चालक आणि वाहकांनी प्रवाशांना निम्म्या रस्त्यातच सोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. भंडारा जिल्ह्यात रात्रीच्या अंधारात दोन अल्पवयीन प्रवाशी मुलींना एसटीतून उतरवल्याचे वृत्त माध्यमांत झळकल्यानंतर संबंधित बसचालक आणि वाहकांचे निलंबन करण्यात आलं आहे. तसेच, यापुढे अशा घटना घडल्यास थेट सेवेतून बडतर्फ करण्यात येईल, असा इशारा देखील परिवहनमंत्र्यांनी दिला आहे.



भंडारा आगाराच्या एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींना रात्रीच्या अंधारात रोहा येथे उतरवल्याचे प्रकरण वृत्तपत्र आणि सोशल मीडियातून समोर आले. 14 नोव्हेंबर रोजी घडलेल्या या घटनेची माध्यमांतील बातम्यांनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडून गंभीर दखल घेण्यात आली. याप्रकरणी संबंधित चालक अनिल सावरे आणि वाहक उदेभान मेश्राम यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार, आज 16 नोव्हेंबरपासून दोघांनाही एसटीच्या सेवेतून निलंबित करण्यात आले. भंडारा विभाग नियंत्रक आणि आगार व्यवस्थापकांकडून प्राथमिक चौकशी करून संबंधित वाहक आणि चालकांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली. एसटीच्या शिस्त व आवेदन कार्यपद्धतीनुसार दोघांविरोधात पुढील कारवाई सुरू झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापर्यंत, गावापर्यंत सुरक्षित पोहोचवण्याची जबाबदारी एसटीची आहे, कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांची मुलांप्रमाणे काळजी घ्यावी, असे निर्देशही सरनाईक यांनी दिले आहेत. तसेच, भविष्यात अशा घटना घडल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना थेट सेवेतून बडतर्फ करण्याचा इशारा देखील परिवहन मंत्र्यांनी दिला.

थोडक्यात...

SIR चा आदेश कोणी दिला : काँग्रेस

मुंबई : दैनिक संध्या

राहुल गांधींसह INDIA आघाडीच्या नेत्यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयात नवीन याचिका दाखल केली आहे. यात निवडणूक आयोगाकडे विशेष सखोल पुनरावलोकन संदर्भात ४८ प्रश्न विचारण्याची परवानगी मागण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी असलेल्या उपनिवडणूक आयुक्तांकडे नोंदींच्या आधारे माहिती नसेल, तर मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) ज्ञानेश कुमार आणि दोन्ही निवडणूक आयुक्त संधू व जोशी यांनी स्वतंत्र प्रतिज्ञापत्रे दाखल करून उत्तरे द्यावीत. काँग्रेसने ४८ प्रश्नांची यादीही दिली आहे. यात SIR दरम्यान कोणत्या निर्णयाला त्यांनी मंजुरी दिली, कोणत्या निर्णयावर आक्षेप घेतला आणि कोणत्या निर्णयाला सहमती दर्शवली, असे विचारण्यात आले आहे. 11 ऑक्टोबर रोजी विरोधी पक्षाच्या खासदारांनी भारताचे सरन्यायाधीश (CJI) सूर्यकांत यांना पत्र लिहून निवेदन सादर करण्यासाठी वेळ मागितला होता. सरन्यायाधीशांनी नकार दिला होता. विरोधी पक्षातील नेत्यांनी १२ ऑक्टोबर रोजी दिल्लीतील बाराखंबा रोडपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढला होता. त्याच दिवशी सर्वोच्च न्यायालयात मुख्य निवडणूक आयुक्त आणि SIR संदर्भात याचिकाही दाखल करण्यात आली होती.

२ दहशतवाद्यांचा एन्काउंटर

मुंबई : दैनिक संध्या

पाच दिवसांपूर्वी कुलगाम जिल्ह्यातील लारू येथील सीआरपीएफ चौकीवर तैनात असलेल्या जवानांवर ३० गोळ्या झाडणाऱ्या दोन दहशतवाद्यांना लष्कराने ठार केले. या हल्ल्यात तीन जवान जखमी झाले. काश्मीर झोन पोलिसांनी सांगितले की, ठार झालेले दहशतवादी हे खोऱ्यातील लश्कर-ए-तोयबाचा एकमेव उरलेला कमांडर लतीफ भट आणि त्याचा साथीदार उमर होते. सुरक्षा यंत्रणांनी उमरचा मृतदेह ताब्यात घेतला आहे, परंतु लतीफचा मृतदेह अद्याप सापडलेला नाही. मात्र, काही प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, लतीफ जखमी असून लपून बसला आहे. त्याचा शोध सुरू आहे. एका लष्करी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांविषयी माहिती मिळाल्यानंतर जम्मू आणि काश्मीर पोलीस आणि सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने तो परिसर सील केला. शोधमोहीम एका संदिग्ध ठिकाणाजवळ पोहोचताच, लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. दोन्ही बाजूंनी चकमक सुरू झाली. तीन तासांच्या चकमकीनंतर ते ठार झाले. चकमकीदरम्यान, लष्कराने चकमकीच्या ठिकाणाजवळील शाळांमधून मुलांना सुरक्षितपणे बाहेर काढले. ११ नोव्हेंबर रोजी नौपोरा अखरान येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात सीआरपीएफचे तीन जवान जखमी झाले होते.

ठाकरेंच्या शिष्टमंडळाला गोडाऊनमध्ये बसवले; पोलिसांना पाहताच आमदारांचा संताप!

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई विद्यापीठाशी संबंधित विषयांसाठी कुलगुरुंना भेटायला गेलेल्या आदित्य ठाकरे आणि त्यांच्यासोबतच्या आमदारांशी घडलेल्या प्रकारावरून चांगलाच राडा झाल्याचं पाहायला मिळालं. कुलगुरुंना भेटायला गेलेल्या शिवसेनेच्या आमदारांना आधी गोडाऊनमध्ये बसवल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर बैठकीवेळी पोलिसांनाही बोलावल्याचा प्रकार घडला. यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार मात्र चांगलेच आक्रमक झाले आणि त्यांनी कुलगुरुंसह विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरलं. मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य प्रदीप सावंत यांना अपात्रतेची नोटीस मुंबई विद्यापीठाकडून पाठवण्यात आली आहे. प्रदीप सावंत हे ठाकरेंच्या शिवसेनेचे सिनेट सदस्य आहेत. या संदर्भात तसेच विद्यापीठाशी विविध विषयांशी संबंधित विषयांवर चर्चा करण्यासाठी आदित्य ठाकरे हे कुलगुरुंना भेटले. यावेळी आदित्य ठाकरे यांच्यासोबत आमदार अनिल परब, वरुण सरदेसाई, सुनील प्रभू, अजय चौधरी, सुनील शिंदे, महेश सावंत, बाळा नर, ज. मो. अभ्यंकर, मनोज जामसुतकर हे उपस्थित होते. कुलगुरुंच्या भेटीच्या आधी या सर्वांना बाहेर गोडाऊनमध्ये बसवल्याचा आरोप आमदारांनी केला. त्यावरून अनिल परब, वरूण सरदेसाई, सुनील प्रभू हे चांगलेच आक्रमक झाले. आदित्य ठाकरे यांच्यासोबत शिवसेनेचे आमदार कुलगुरुंशी चर्चा करण्यासाठी गेले असता त्या ठिकाणी पोलीस उपस्थित होते. ते पाहून शिवसेनेचे आमदार चांगलेच भडकले. आमदार वरून सरदेसाई यांनी कुलगुरुंना यासंबंधी जाब विचारला. आम्ही ज्या ज्या वेळी विद्यापीठात तुम्हाला भेटायला येतो त्या त्या वेळी पोलिसांना का बोलावलं जातं? आम्ही काही अतिरेकी आहोत का? अशा शब्दात वरुण सरदेसाई यांनी आपला संताप व्यक्त केला. याच मुद्द्यावरून आमदार अनिल परबही चांगलेच भडकले. तुमच्याशी चर्चा करायची असेल तर आम्ही ती पोलिसांसमोर करू का? असा सवाल त्यांनी विचारला. आधी पोलिसांना इथून बाहेर काढा, असं अनिल परब म्हणाले.



जळगाव DCC बँक निवडणुकीतून भाजपा उमेदवाराची माघार

जयश्री पाटील बिनविरोध

■ जळगाव (दै. संध्या)

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे नेते तथा माजी मंत्री अनिल पाटील यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकासाठी अमळनेर विकास सोसायटी मतदारसंघातून त्यांच्या पत्नी जयश्री पाटील यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. भाजपचे उमेदवार प्रफुल्ल पवार यांनी माघार घेतल्याने जयश्री पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज शिल्लक राहिला आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या राजकारणात अनिल पाटील यांचा दबदबा कायम असल्याचे चित्र आहे. तर, महायुती म्हणून आम्ही एकत्र लढणार आहोत, 80 टक्के जागांबाबत वाटाघाटी झाल्याचं मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितलं.

जळगावमधील अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते तथा आमदार अनिल पाटील यांच्या पत्नी जयश्री पाटील या जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत बिनविरोध झाल्याने पाटील यांनी गुलाल उधळला आहे. तर, पत्नी जयश्री पाटील हिने राजकारणात आपले अस्तित्व सिद्ध केले आहे, तिच्या कर्तृत्वावर ती बिनविरोध निवडून आल्याचं आ. अनिल पाटील यांनी बिनविरोध निवडीनंतर माध्यमांशी बोलताना म्हटले. मात्र, महायुती म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या निवडणुका आम्ही एकत्र लढणार असल्याने जागावाटपानंतर कार्यकर्त्यांना अर्ज मागे घेण्याची विनंती करणार आहोत, असे गिरीश महाजन यांनी सांगितले.



जळगाव जिल्हा बँक निवडणूक आम्ही महायुतीच्या माध्यमातून लढणार आहोत. येथील 80 टक्के जागांबाबत आमच्या वाटाघाटी झाल्या आहेत, उर्वरित दोन- तीन जागांबाबत आम्ही एकत्र बसून तोडगा काढणार असल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. निवडणूक महायुतीमध्ये असल्याने आमच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद होऊ नये. यासाठी ज्या ज्या ठिकाणी ज्या पक्षाला जागा सुटल्या असतील त्या ठिकाणी अन्य पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज माघारी घेतले जातील, तशी विनंती आम्ही कार्यकर्त्यांना करणार आहोत, असेही महाजन यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, जळगावमधील आजच्या जयश्री पाटील यांच्या बिनविरोध निवडीनंतर शिवसेना नेते तथा मंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. जळगाव जिल्हा बँक जागावाटपाचा तिढा संपुष्टात येईल, थोड्या वेळात आमची बैठक होणार आहे, तो तिढा सुटेल, असे त्यांनी म्हटले. तसेच, उद्या आणखी जागा बिनविरोध होतील, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान जिल्हा बँकेच्या एकूण 21 जागांसाठी येत्या 29 तारखेला निवडणूक होत आहे, या निवडणुकीपूर्वीच 4 जागा बिनविरोध झाल्या आहेत.

मविआकडून एका जागेची मागणी

जळगाव बँक निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून सर्वपक्षीय निवडणूक लढविण्याबाबत आग्रह केला जात आहे. एका जागेची ते मागणी करत आहेत, मात्र आमच्या मध्येच प्रत्येक जागेसाठी चढा ओढ आहे. त्यामुळे, मविआला एक जागा दिली तर आमची एक जागा कमी होणार आहे, याबाबत आज संध्याकाळी होणाऱ्या आमच्या बैठकीत आम्ही निर्णय घेऊ

दादांचा घातपात करणाऱ्यांना वाचवल्याचा आरोप

रोहित पवारांनी 'मफलर मॅन' म्हणून देवेंद्र फडणवीसांचा फोटो दाखवला

■ मुंबई (दै. संध्या)

अजितदादांच्या अपघातामागे असलेल्या VSR कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न महाराष्ट्रातील एक नेता करत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी या आधी केला होता. त्याचं नाव आता रोहित पवारांनी जाहीर केलं. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच VRS कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न केला असा आरोप रोहित पवार यांनी केला. देवेंद्र फडणवीस हे व्ही के सिंहच्या जयपूरमध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. त्यांनीच या कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. यामध्ये जर चूक असेल तर सरकारने तपास करावा, असं आव्हानही रोहित पवार यांनी केलं. या सरकारने व्ही के सिंह आणि त्याच्या कंपनीला जरी वाचवण्याचा प्रयत्न केला असला तरी आमचं सरकार आलं तर त्याला सोडणार नाही. त्यांचा हा पुतण्या कुणालाही सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. व्ही. के. सिंह आणि व्हीएसआर कंपनीला वाचवणारे देवेंद्र फडणवीस हेच नेते आहेत असं आमचं ठाम मत आहे. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत, यांच्याकडे सत्ता आहे, सीआयडी आहे. पंतप्रधान त्यांचं ऐकतात, सीबीआय त्यांचं ऐकू शकते. पण आतापर्यंत तपास का होत नाही? याचं मुख्य कारण म्हणजे आपले मुख्यमंत्री फडणवीस हे व्ही. के. सिंह याचे निकटवर्तीय आहेत, असं आमचं ठाम मत आहे. आम्ही जर आमच्या काकाला न्याय देऊ शकलो नाही तर गरीबांना न्याय काय देणार? असा प्रश्न सातत्याने मनाला पडतोय. त्यामुळे मी जर दादांना न्याय देण्यासाठी काही गोष्टी समोर आणल्या तर उद्या माझे राजकारण धोक्यात येऊ शकेल. पण माझ्यावर त्याचा काही परिणाम होणार नाही. मी ज्या व्यक्तीचं नाव घेत आहे त्या व्यक्तीने अजितदादांचा घातपात केला असं मी म्हणत नाही. परंतु, अजितदादांचा अपघात झाला त्या कंपनीच्या मालकाला वाचवण्याचा प्रयत्न त्याच्याकडून केला जात असल्याचा आम्हाला संशय आहे, असं रोहित पवार म्हणाले. अजितदादा गेल्यानंतर दोन दिवसात VSR कंपनीच्या मालकाच्या मुलाने, रोहित सिंहने अमेरिकेत 18 कोटींचे घर विकत घेतले. त्याने ज्याच्याकडून घर विकत घेतलं तो ड्रग तस्करीचं काम करतो. तसेच रोहित सिंहचा व्यावसायिक पार्टनर हा ड्रग्ज तस्करीमध्ये आहे. एका वेळी दोन हजार कोटींची तस्करी ते करतात.



अजित पवारांच्या विमान अपघाताच्या तपासामध्ये सरकारी स्तरावरून काहीही प्रयत्न होत नाही, सीबीआयलाही या प्रकरणात गुन्हा दाखल करू वाटत नाही. त्यामुळे अजितदादांचा पक्षाला सत्तेत असूनही काहीही करता येत नसेल तर तो निर्लज्जपणा आहे, अशा शब्दात आमदार रोहित पवार यांनी टीका केली. अजितदादांच्या बंगल्याबाहेर काळी जादू करण्यात आली होती, त्यामध्ये कोकणातील एका नेत्याचा सहभाग असू शकतो, असं रोहित पवार म्हणाले. दादांच्या विमान अपघातासंबंधी DGCA कडे अनेक पुरावे देऊनही त्यावर काहीही कारवाई झाली नाही, हे दुर्दैव असल्याचं रोहित पवार म्हणाले. त्यामुळे VSR कंपनीचे सर्व व्यवहार हे संशयास्पद आहेत. त्यांच्याकडे भरमसाठ पैसा असल्यानेच त्यांच्या विरोधात आवाज उठवण्याचं सत्ताधाऱ्यांचं धाडस नाही. त्यामुळे व्ही के सिंह याला सत्ताधारीच वाचवत आहेत, असा आरोप रोहित पवार यांनी केला. जोपर्यंत या लोकांची चौकशी होणार नाही तोपर्यंत सत्य समोर येणार नाही. व्ही के सिंह याच्या 27 कंपन्या आहेत. 868 कोटी रुपयांचा पैसा कोलकात्याच्या कंपनीच्या माध्यमातून त्याने व्हाईटमध्ये केला. पण ईडी यावर काहीही प्रश्न विचारत नाही, हे दुर्दैव आहे, असं रोहित पवार म्हणाले.

नवीन लोक येत असतील तर स्वागतच

अमित देशमुख

■ लातूर (दै. संध्या)

लातूर येथील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सत्ता पुन्हा एकदा काँग्रेसच्या हाती आली आहे. काँग्रेस नेते दिलीपराव देशमुख आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या सहकार पॅनलनं या निवडणुकीत विजय मिळवला. सहकार पॅनलनं 19 पैकी 14 जागी विजय मिळवण्यात यश मिळवलं. सहकार पॅनेलला माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शन मिळालं. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या पुढाकारात आमदार अमित देशमुख आणि माजी आमदार धीरज देशमुख यांनी पॅनलचं नेतृत्व केलं. जिल्हा बँक निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर अमित देशमुख, धीरज देशमुख आणि खासदार शिवाजी काळगे यांनी शिट्टी वाजवून आनंद साजरा केला. अमित देशमुख आणि धीरज देशमुख यांनी कार्यकर्त्यांबरोबर या विजयाचा जल्लोष साजरा केला... धीरज देशमुख, आमदार अमित देशमुख आणि खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी जिल्हा बँक निवडणुकीत सहकार पॅनलनं विजय मिळवल्यानंतर निवडणूक चिन्ह असलेली शिट्टी वाजवून आनंद साजरा केला. राज्याच्या नव्या सहकार धोरणात सहकारी संस्थांच्या संचालक मंडळात किमान एक तृतीयांश महिला सदस्य आणि 40 वर्षांखालील तरुणांचा सहभाग बंधनकारक करण्याचा प्रस्ताव आहे. या निर्णयाचे आमदार अमित देशमुख यांनी स्वागत करत असल्याचं म्हटलंय.

संपादकीय

न्यायव्यवस्थेने दखल घ्यायलाच हवी

लोकशाही व्यवस्थेत नागरिकांचा विश्वास कायदेमंडळ, व कार्यकारी मंडळापेक्षा जास्त न्याय मंडळावर असतो देशाचे पंतप्रधान, मुख्यमंत्री, राष्ट्रपती, मंत्री, खासदार, आमदार,किंवा एखाद्या मोठ्या अधिकाऱ्यासमोर वाकून नमस्कार करण्याचा कोणताही अधिकार भारतामध्ये नाही. सर्वसामान्य नागरिकही तसा नमस्कार करत नाहीत. परंतु प्रत्येक नागरिक तालुका न्यायालयाच्या दंडाधिकारी पासून ते सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशापर्यंत सर्वांना अगदी वाकून नमस्कार करतो.वकील देखील प्रत्येक न्यायाधीशाला माय लॉर्ड म्हणून सन्मान देतात. न्यायाधीशाचा निर्णय वकिलाच्या विरोधात असला तरी "ऑलराईज माय लॉर्ड "असे शब्द आभार मानून अगदी आदबीने न्यायालयासमोर लोकशाहीचा सन्मान राखला जातो. हा फक्त सन्मान फक्त आणि फक्त न्यायव्यवस्थेलाच मिळतो. परंतु मागच्या काही दिवसात देशामध्ये न्यायालय, आणि न्यायाधीशाबद्दलची खूपच वेदनादायी चर्चा सुरू आहे,ती अत्यंत खेदजनक आहे. या कुजबुजीची योग्य मार्गाने दखल घेतली गेली नाही तर याचा फार गंभीर परिणाम आगामी काळात न्यायव्यवस्थेच्या विश्वासाहर्तावर होऊ शकतो असे म्हटलेले आहे. या अगोदर शहरातील विधी महाविद्यालयात प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी,किंवा जिल्हा न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश,आले तर विद्यार्थी त्यांच्या स्वागतासाठी गर्दी करायचे, त्यांच्या हाताने बक्षीस किंवा पदवी घेणे हे अभिमानास्पद वाटायचे, परंतु सध्या भारताच्या न्यायालयातील न्यायाधिशाना विधी महाविद्यालयाच्या पदवीदान सोहळ्यासाठी व पदवी प्रदान करण्यासाठी बोलवायचे नाही. असा ठराव विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केला असल्याचे समजते. हे निश्चितच हे खेदजनक आहे. अशा प्रकारे आज पर्यंत कधीही विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून न्यायाधीशांना आमंत्रित करण्यामध्ये विरोध केलेला दिसून येत नाही. हे सगळे आत्ताच का घडत आहे?...याचा विचार न्यायव्यवस्थेने करणे आवश्यक आहे. त्यामध्ये सर्वात चिंताजनक काय असेल तर अनेक वरिष्ठ वकिलांनी ही विद्यार्थ्यांच्या या कृतीचे समर्थन केलेले आहे. याकडे राजकारणाच्या दृष्टीने बघणारे त्या दृष्टीने बघतील?...त्यांनी त्याचा अपेक्षित अर्थही काढला असेल?.. तर परंतु न्यायव्यवस्थेबाबतची हे चित्र निश्चितच खूप भयानक आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. हा मुद्दा फक्त न्याय सरन्यायाधीश किंवा दुसऱ्या एखाद्या न्यायाधीशापुरता मर्यादित नाही असे मानणे म्हणजे न्यायमंडळ वेगळे,आणि त्यात काम करणारे न्यायाधीश वेगळे,असे आकलन करण्यासारखे होईल,तसे करणे हे तर आणखीन अयोग्य ठरेल, सरन्यायाधीशांनी विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे स्वागत करताना भारतीय अधिवक्ता मंडळाला यापासून दूर राहाण्याचा सल्ला देऊन चांगलेच काम केले याबद्दल दुमत नाही. हा विरोध फक्त विद्यार्थ्यापुरता मर्यादित आहे काय असे मानता येईल का?... मागच्या काही वर्षांमध्ये अनेक संवैधानिक विषय न्यायव्यवस्थेसमोर आव्हान म्हणून उभे राहिले. निवडणूक आयोगाचे निर्णय, मुख्य निवडणूक आयुक्त यांची निवड, पक्षाचे चिन्हाचा विषय, पक्षांतर बंदी कायदा, हे ते विषय होत, भारतातील नामांकित वकिलांनी या विषयात न्यायालयासमोर बाजू मांडली.मुख्यमंत्री असलेल्या ममता बॅनर्जी यांनी स्वतः मुद्दे मांडले,माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी तर दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी त्यांच्या केसमधून माघार घ्यावी म्हणून स्वतः वादविवाद केला, असे आजपर्यंत कधी घडले नव्हते.न्यायालयाची स्वायत्तता, आणि विश्वासार्हता ही लोकशाहीसाठी फार आवश्यक आहे.मुद्दा हा आहे? की कोणाच्या बाजूने निकाल लागला हा नसून, वेळेत निर्णय व्हावा हा आहे. सामान्य नागरिक स्वतःच्या अनुभवातून मत बनवत असतात. तर त्यांच्या दाव्याचा,जामीनाचा, निकाल लवकर लागतो की नाही?...यावरून ते मत प्रदर्शित करत असतात. निकालास होणारी दिरंगाई,ही माज राजकीय पक्षाबरोबरच सामान्य माणसालाही न्यायव्यवस्थेसंबधी अनावश्यक वक्तव्य करण्यास भाग पाडते.संवैधानिक प्रकरण हाताळताना वेळ लागतो, न्यायाधीशांना अनेक प्रकरणे ऐकावी लागतात, ही वस्तुस्थिती असली तरी एखादा सामान्य पक्षकार स्वतःच्या प्रकरणात लागलेल्या वेळ बघून न्यायव्यवस्थेबद्दल जो विचार करतो?...तो न्यायव्यवस्थेसाठी निश्चितच योग्य नाही. एक प्रकरण पूर्णपणे निकाली काढण्यासाठी किमान काही वर्षे लागतात.अनेक कारागृहातील कच्चे कैदी, त्याच्या जामीनाची व खटला संपण्याची वाट बघत आहेत. फक्त न्यायालये यासाठी कारणीभूत आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल. परंतु त्याबाबतचा योग्य मार्गही न्यायालयाला काढावा लागेल. न्याय व्यवस्थेचा भाग नसलेले घटक जर काही गैरसमजतीतून न्यायालयीन व्यवस्थेविषयी काही मत बाळगून बसले असतील तर ते दूर करणे तेवढेच कठीण काम नाही, न्यायालय ही आपल्या कृतीतून ते करू शकतात. पण जी मोठ्या आवाजातील कूजबूज न्यायालयाच्या आतून व बाहेरून चाललेली आहे ती मात्र या व्यवस्थेवर विश्वास डळमळीत करू शकते. याची नोंद न्यायालयीन व्यवस्थेने गंभीरपणे घ्यायला हवी. न्यायव्यवस्थेनेही आता बदलायला हवे,हीच अपेक्षा सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत. आज सर्वोच्च न्यायालयापासून सर्वच लहान मोठ्या न्यायालयात हजारो लाखो खटले प्रलंबित आहेत, आज केवळ तहसील स्तरापर्यंत न्यायालय आहेत, खेड्यापाड्यातून अशीलच नव्हे तर मोठ्या संख्येने वकील सुद्धा तालुक्याला, जिल्ह्याला रोज येजा करतात. लहान गावांमध्ये ही यासाठी ग्राम न्यायालय सुरू करायला हवीत. अशील व वकील या दोघांचेही हेलपाटे वाचतील, सर्वच वरिष्ठ न्यायालयाचा बोजा कमी होईल, पण त्याहीपेक्षा न्यायालयीन प्रकरणाचा निपटारा वेगाने होईल. सामान्य नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला असला तरी अद्याप पूर्णपणे मिटलेल्या नाही. न्यायाधीशांना समाजात, न्यायालयात, मिळणारा सन्मान हा कदाचित पंतप्रधान, मुख्यमंत्री, व राष्ट्रपती, यांच्या वाट्याला देखील येत नाही. हे खरे पण न्यायव्यवस्थेला या सन्मानाची किंमत किती आहे? अत्यंत प्रतिष्ठित माजी न्यायमूर्ती देखील जेव्हा वर्तमान व्यवस्थेचे कान उपटतात?...तेव्हा परिस्थिती खूपच गंभीर आहे. व त्याची संबंधितांनी योग्य ती दखल घेणे उचित ठरेल. पण तशी ती घेतली जात आहे असे प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर सुद्धा जाणवत नाही. त्यामुळे ही न्यायव्यवस्थेबद्दलची कुजबुज व अस्वस्थता वाढतच आहे हे नाकारता येणार नाही. न्यायप्रक्रिया ही शिक्षा, न्यायदानातील विलंब ही सत्तेची ही शांततेची संधी, या दोन्ही धारणांना कृतीतून मुठमाती दिली जावी. अशी अपेक्षा सर्वसामान्य व्यक्त करत आहेत. त्यासाठी लोकशाहीच्या चार स्तंभात वरचढ असलेल्या कायदेमंडळाने विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. नाहीतर लोकशाहीची इमारत जरी कमी -जास्त ढासळलेल्या खांबावर उभी दिसली,तरी अशा इमारतीचे धोके ओळखून तिच्यात निवास करण्यात सर्वसामान्य जनता नकारही कालांतराने देऊ शकेल! कायदे तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम राज्यघटनेने कायदेमंडळ, व कार्यकारी मंडळावर सोपविलेले आहे.परंतु हे कायदे राज्य घटनेशी सुसंगत आहेत.? किंवा नाही? ते ठरवण्याची जबाबदारी न्यायव्यवस्थेवर आहे. नागरिकांच्या मूलभूत अधिकारावर अतिक्रमण झाल्यास त्या हक्काच्या संरक्षणाची जबाबदारी देखील न्यायव्यवस्थेवर आहे.कार्यकारी मंडळाचा दबाव न्यायव्यवस्थेवर असणे ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. देशातील सर्वसामान्य लोकांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास ज्या ठिकाणी ढळतो,तेथील राजकीय व्यवस्था एखाद्या वाळूच्या किल्ल्यासारखी असते आणि हा वाळूचा किल्ला केव्हा कोसळेल याचा नेम नसतो. त्यामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ होण्यासाठी या व्यवस्थेने कृतीतून तसा विश्वास निर्माण करणे गरजेचे आहे.

रात्रीच्या अंधारात डीपी पाडायचे अन् तांब्याच्या तारा लंपास करायचे

शिक्रापूर पोलिसांनी पाच जणांची टोळी केली जेरबंद, आठ गुन्ह्यांचा पर्दाफाश, १७० किलो तांब्याच्या तारा हस्तगत

पोलिसांना मदत करणाऱ्या नागरिकांचा शिक्रापूर पोलिसांकडून सत्कार..

■ शिक्रापूर (दै. संध्या)

रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत शेतशिवारातील विद्युत रोहित्र (डीपी) लक्ष्य करून त्यातील तांब्याच्या तारा चोरणाऱ्या टोळीचा शिक्रापूर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल आठ ठिकाणी डीपी चोरी केल्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून २ लाख २९ हजार ५०० रुपये किमतीच्या १७० किलो तांब्याच्या तारा हस्तगत केल्या आहेत. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे डीपी चोरांच्या टोळीचे धाबे दणाणले आहे. (दि.६ नोव्हेंबर २०२६) रोजी रात्री शिक्रापूर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार किरण ढुके व पोलीस अंमलदार लहानु बांगर हे अरणगाव परिसरात गस्त घालत होते. यावेळी अरणगाव व उरळगाव गावच्या शिवेवर विद्युत रोहित्र चोरीचा प्रयत्न झाल्याची माहिती त्यांना स्थानिकांकडून मिळाली. पोलिसांनी तत्काळ वरिष्ठांना माहिती देत परिसरात संशयितांचा शोध



सुरू केला. दरम्यान, विनानंबर प्लेटच्या पल्सर मोटारसायकलवरून जाणारे दोघे संशयास्पद दिसून आले. पोलिसांनी त्यांना थांबविण्याचा प्रयत्न करताच त्यांनी मोटारसायकलचा वेग वाढवून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांना अडविल्यानंतर दोघांनी मोटारसायकल सोडून अंधाराचा फायदा घेत उसाच्या शेतात धूम ठोकली.

पोलिसांनी स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने उसाच्या शेतात शोधमोहीम राबवली. अखेर सकाळी दोघांना पकडण्यात पोलिसांना यश आले. प्रदीप राजेंद्र शिंदे (वय २७) व सुनील पोपट केदार (वय २५, दोघे रा.नांदूर, खंदारमळा, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) अशी त्यांची नावे आहेत. चौकशीत त्यांनी डीपीमधील तांब्याच्या तारा चोरण्यासाठी आल्याची कबुली दिली. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही आरोपींना अटक करून न्यायालयाकडून पोलीस कोठडी

नागरिकांच्या सतर्कतेला पोलिसांची शाबासकी!

डीपी चोरांना पकडण्यासाठी मोलाची मदत करणाऱ्या उरळगावच्या संतोष सात्रस, विनायक सात्रस, लहू हुजगे, निलेश सात्रस, काळुराम चोरमले व संजय चोरमले या सहा नागरिकांचा उपक्रमशील पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पोलिसांसोबत खांद्याला खांदा लावणाऱ्या नागरिकांच्या सतर्कतेचे यादव यांनी विशेष कौतुक केले.

मिळविण्यात आली. या काळात पोलिसांनी सखोल तपास केला असता, या चोरीच्या घटनांमध्ये आणखी तीन साथीदारांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. संदीप यशवंत काळे (वय २३), निवृत्ती भाऊसाहेब मेंगाळ (वय २१, दोघे रा.नांदूर, खंदारमळा, ता.संगमनेर) आणि राजेंद्र सोमनाथ वर्पे (वय ३२, रा. वरवंडी, थापलीवस्ती खंडोबा, ता.संगमनेर) अशी त्यांची नावे आहेत. या तिघांच्या शोधासाठी पोलिसांनी दोन पथके तयार केली. पथकांनी तिन्ही आरोपींना ताब्यात घेतल्यानंतर केलेल्या चौकशीत त्यांनी पहिल्या दोघांच्या साथीने शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आठ ठिकाणचे विद्युत रोहित्र रात्रीच्या वेळी खाली पाडून त्यातील तांब्याच्या तारा चोरल्याची कबुली दिली. त्यानुसार पाचही आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून चोरीच्या १७० किलो तांब्याच्या तारा जप्त करण्यात आल्या आहेत. या मुद्देमालाची किंमत २ लाख २९ हजार ५०० रुपये आहे.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक डॉ.शुभम कुमार व शिरूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत गिरी, पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर, सहाय्यक फौजदार लहानु बांगर, पोलीस हवालदार किरण ढुके, रोहिदास पास्ते, अमोल दांडगे, शिवाजी चितारे, विश्वंभर वाघमारे तसेच पोलीस अंमलदार भारत भोसले, नारायण वाळके, राम जाधव, मच्छिंद्र निचीत, नागेश वाघमारे व योगेश भंडारे यांनी सहभाग घेतला. पुढील तपास किरण ढुके व भारत भोसले करीत आहेत.

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी जेजुरीत समाजबांधवांशी साधला संवाद



■ जेजुरी (दै. संध्या)

ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी 16 नोव्हेंबर रोजी पुरंदर तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्या दरम्यान त्यांनी नीरा येथील राजेंद्र बरकडे यांच्या आईच्या वर्षश्राद्ध कार्यक्रमास उपस्थिती लावली. तसेच जेजुरी येथे ओबीसी समाज बांधवांच्या समस्या जाणून घेऊन संवाद साधला.

प्रा लक्ष्मण हाके यांची जेजुरी व पंचक्रोशीतील ओबीसी समाजबांधवांसह बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पांडेश्वर, नीरा, गुळूंचे, जवळार्जुन आदी गावांतील समाजबांधव संख्येने उपस्थित होते. यावेळी श्रीकांत राणे यांनी ओबीसींच्या खोट्या नोंदी करून कुणबी दाखले मिळविण्याच्या कथित प्रकारांवर नियंत्रण आणावे, तसेच अशा दाखल्यांच्या आधारे ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसाठी उत्पन्नाची अट लागू करण्याची मागणी त्यांनी केली. तर संतोष खोमणे यांनी चिंचेच्या जागेचा प्रश्न उपस्थित केला.तसेच ओबीसी समाजाच्या मागण्याबाबत लक्ष्मण हाके यांना निवेदन देण्यात आले. प्रा. लक्ष्मण हाके यांनी ओबीसी समाजाची सद्यस्थिती, समाजापुढील आव्हाने आणि भविष्यातील संघटनात्मक दिशा याबाबत सविस्तर भूमिका मांडली. समाजाने एकजूट ठेवून आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी बापूराव सोनवलकर, नाना मदने, तात्यासाहेब देढे, तानाजी कोळेकर, अजय आटोळे, संतोष मोरे, राजेंद्र रासकर,किरण कुऱ्हे ,दिलीप क्षीरसागर, भगवान शेंडगे यांच्यासह परिसरातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अखिल भारतीय ओबीसी सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष श्रीकांत राणे यांनी केले.

नवविवाहितांची जेजुरी गडावर गर्दी



■ जेजुरी (दै. संध्या)

दिवाळी नंतर सर्वत्र लग्न सराई सुरु झाली आहे. लग्न झाल्यानंतर नवविवाहित दाम्पत्यांनी जेजुरी गडावर जावून साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत व दक्षिण भारताची काशी असणाऱ्या खंडोबा व म्हाळसा देवीचे दर्शन घेण्याची पारंपारिक प्रथा असून या परंपरेनुसार सध्या देवदर्शन व कुलधर्म कुलाचाराच्या विधीसाठी नवविवाहित जोडप्यांची गर्दी जेजुरी गडावर पाहण्यास मिळत आहे. शिवशक्ती म्हणजेच शंकर व पार्वती यांचे वास्तव्य हिमालयातील कैलास शिखरा नंतर दक्षिण भारतात जेजुरीला खंडोबा व म्हाळसा देवीच्या रूपाने पाहण्यास मिळते म्हणून जेजुरीला दुसरे कैलास शिखर संबोधले जाते. महाराष्ट्रामध्ये नवविवाहित जोडप्यांनी लग्न झाल्यानंतर भावी सुखी संसारासाठी जेजुरी गडावर जावून खंडोबा व म्हाळसा देवीचे दर्शन घेवून कुलधर्म कुलाचारनुसार तळी भंडार, जागरण गोंधळ. लंगर तोडणे, पुरणपोळीचा नैवद्य देवाला दाखविणे हा विधी केला जातो. रूढी परंपरेनुसार आजही हि प्रथा सुरु आहे. सध्या लग्न सराई सुरु झाली असून दररोज अनेक नवविवाहित जोडपी जेजुरीला येत आहेत. गडावर जाण्यापूर्वी गडाच्या पायथ्याशी पहिल्या पाच पायऱ्या नवऱ्याने नववधूला उचलून घेण्याची प्रथा आहे. नवविवाहित जोडपे या प्रथेत आनंदाने सहभागी होतात. जेजुरी गडावर जावून खंडोबा व म्हाळसा देवीचे दर्शन, भंडार खोबऱ्याचा तळी भंडाराचा विधी गडावर करीत आहेत. लग्नात नवीन देवाचे टाक केले जात असल्याने हे देव गडावर देवभेटीसाठी आणून परंपरे नुसार जागरण गोंधळ, लंगर तोडणे, देवाला पुरणपोळीचा नैवद्य दाखविणे हा विधी गडावर तसेच चिंचेची बाग, पुजारी सेवक वर्गाच्या निवासात पहाण्यास मिळत आहे.

अबब..! बारामती तालुक्यातील वाकी तलावाखालील ओढाच गायब!

खोलीकरण, रुंदीकरण, निधी आणि कामांच्या बिलांची चौकशी करण्याची मागणी

■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील मौजे चोपडज ग्रामपंचायत हद्दीतील कानाडवाडी येथील गट नं.७९ शेजारी,वाकी तलावाच्या खालच्या बाजूस वाकी व कानाडवाडी गावांच्या हद्दीतून जाणारा नैसर्गिक ओढा प्रत्यक्ष जागेवरून गायब झाल्याचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.महसूल अभिलेखात आणि नकाशात ओढ्याची नोंद असल्याची माहिती असताना प्रत्यक्ष ठिकाणी मात्र ओढ्याचे अस्तित्व दिसून येत नसल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी दत्तात्रय श्रीपती गायकवाड यांनी तहसीलदार,बारामती यांच्याकडे लेखी अर्जाद्वारे केली आहे.

नकाशावर ओढा दाखविला जात असेल,तर प्रत्यक्ष जागेवर तो नेमका कुठे आहे?त्याचे मूळ पात्र कोणत्या ठिकाणी आहे?ओढ्याचे पात्र बुजविण्यात आले आहे का?त्यावर अतिक्रमण झाले आहे का?अथवा नैसर्गिक प्रवाह वळविण्यात आला आहे का?असे अनेक प्रश्न या उपस्थित झाले आहेत. या प्रकरणात केवळ



फाईल फोटो

ओढ्याचे अस्तित्व शोधण्यापुरती चौकशी मर्यादित न ठेवता, संबंधित ओढ्यावर यापूर्वी कोणती विकासकामे करण्यात आली होती का,याचीही तपासणी देखील महत्त्वाची आहे.ओढ्याचे खोलीकरण, रुंदीकरण,स्वच्छता,दुरुस्ती अथवा इतर कोणती कामे करण्यात आली होती का?ही कामे कोणत्या विभागामार्फत मंजूर झाली?त्यासाठी किती निधी मंजूर झाला?प्रत्यक्ष काम किती झाले?कामांची बिले कोणी तयार केली,कोणी तपासली आणि कोणी मंजूर करून अदा केली?प्रत्यक्ष काम न करता अथवा अपूर्ण काम असताना बिले काढण्यात आली आहेत का?या सर्व बाबींची कागदपत्रांसह चौकशी होणे आवश्यक आहे. सदर ओढ्याचे मूळ पात्र गायब होण्यामागे नेमकी कोणती कारणे आहेत,याची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. ओढ्याच्या जागेवर अतिक्रमण झाले असल्यास संबंधित व्यक्ती कोण?ओढ्याचा प्रवाह बदलण्यास कोणी परवानगी दिली?ओढ्याचे पात्र बुजविण्यात आले असल्यास त्याकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष का केले?अशा प्रश्न उपस्थित होत आहे.

दत्तात्रय गायकवाड यांनी महसूल अभिलेख व गाव नकाशाची तपासणी करून भूमिअभिलेख विभागामार्फत अधिकृत मोजणी करण्याची मागणी केली आहे.महसूल व भूमिअभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर येऊन ओढ्याचे मूळ पात्र आणि नैसर्गिक प्रवाह निश्चित करावा.ओढ्याचे अस्तित्व नष्ट झाल्याचे अथवा अतिक्रमण झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करून मूळ पात्र मोकळे करावे,अशी मागणीही करण्यात आली आहे. नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. शासकीय नकाशावर ओढा अस्तित्वात असताना प्रत्यक्ष जागेवर त्याचे अस्तित्व दिसत नसेल,तर हा केवळ नकाशाचा प्रश्न नसून सार्वजनिक नैसर्गिक संपत्तीच्या संरक्षणाचा प्रश्न आहे.त्यामुळे या प्रकरणात कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष स्थळपाहणी,अधिकृत मोजणी आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी करून सत्य जनतेसमोर आणण्याचे मोठे आव्हान महसूल प्रशासनासमोर उभे राहिले आहे.


नकाशात दाखविलेला ओढा प्रत्यक्षात कुठे आहे,त्याचे पात्र कोणी गायब केले आणि त्यासाठी जबाबदार कोण,याचा उलगडा होणार का? याकडे आता संपूर्ण बारामती तालुक्याचे व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सदर ओढ्यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी भूमिअभिलेख कार्यालयात जाऊन संबंधित नकाशांची पाहणी करावी लागेल.तसेच ओढ्यामध्ये करण्यात आलेल्या अतिक्रमणाबाबत सध्या माझ्याकडे कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

- संदीप कांबळे, तलाठी, वाकी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

‘चित्रपताका-२०२६’च्या दुसऱ्या पर्वाचा दिमाखदार शुभारंभ!



सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते उद्घाटन; अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती

■ ‘बंधू’ चित्रपटाच्या प्रदर्शनाने महोत्सवास प्रारंभ; ३३ सिनेमे आणि १५ हून अधिक संवादसत्रांची पर्वणी

■ पुणे (दै. संध्या)

सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित ‘चित्रपताका-२०२६’ या महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाच्या दुसऱ्या पर्वाचा उद्घाटन सोहळा रविवारी, १५ नोव्हेंबरला दिमाखात संपन्न झाला. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. ‘बंधू’ या सिनेमाच्या प्रदर्शनाने रविवारपासून या चार दिवसीय महोत्सवाचा प्रारंभ झाला असून महोत्सवात ३३ सिनेमे आणि १५ हून अधिक संवादसत्रांची पर्वणी रसिकांना मिळणार आहे. प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलात १५ ते १८ नोव्हेंबर दरम्यान हा महोत्सव संपन्न होणार असून रविवारी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याला सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, प्रमुख पाहुण्या म्हणून अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, महोत्सव संचालक पुरुषोत्तम बेर्डे, प्रभात चित्र मंडळाचे अध्यक्ष किरण शांताराम, उद्घाटकीय सिनेमा असलेल्या ‘बंधू’ चित्रपटातील कलाकार जितेंद्र जोशी, उपेंद्र लिमये यांच्यासह अलेक्झांडर माक्सुको (बेलारूस), फर्झाना अहमद चौधरी (बांगलादेश), पीअर स्टिवरलिंक (बेल्जिअम), कुईन जी (चीन), झिपोर झामा (दक्षिण आफ्रिका), दहलिया तबकोल (इजिप्त), वू थी टू (व्हिएतनाम), महम्मद कुर्निया वान (इंडोनेशिआ), मिस ऑड्रिना विलानोएवा बेसरल (मेक्सिको), मिस प्रियांका (श्रीलंका) आदी देशांचे दुतावास अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी चित्रपताका महोत्सवामागील शासनाची भूमिका मांडली. राज्य शासन चित्रपट क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून विविध योजना, उपक्रमांच्या माध्यमातून चित्रपटकर्मींना प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न आहे. तसेच मराठी चित्रपटांनी सातत्याने अनवट विषय हाताळले, वेगळे प्रयोग केले आणि प्रतिकूल परिस्थितीतही दर्जेदार कलाकृतींची निर्मिती केली, ही अभिमानाची बाब असल्याचे सांगत त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीतील निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ यांच्या जिद्दीचे विशेष कौतुक केले. कोविड काळात निर्माण झालेल्या चित्रपटांना राज्य शासनाने विशेष अनुदान देऊन प्रोत्साहन दिल्याचाही त्यांनी उल्लेख केला. याप्रसंगी ‘चित्रपताका’च्या यंदाच्या पर्वाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर करून त्यांनी ‘चित्रपताका’ महोत्सव आगामी काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक स्वरूपात पोहोचावा, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही दिली. राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावरील महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपटांची निर्मिती राज्य शासनाकडून केली जाते. त्याच धर्तीवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करून उत्तम चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या कलाकार आणि तंत्रज्ञांच्या कलाकृतींनाही प्रोत्साहन देण्याचा शासनाचा विचार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच सांस्कृतिक संवादाच्या दृष्टीने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र व देशाच्या कला-संस्कृती-परंपरेची ओळख दृढ करण्यासाठी मराठी सिनेमा महत्त्वपूर्ण भूमिका निभावू शकतो. त्याहृष्टीने याप्रसंगी उपस्थित विविध देशांतील दूतावास अधिकाऱ्यांना त्यांनी मराठी सिनेमाला त्यांच्या देशात अवकाश उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन केले. मराठी चित्रपटांना प्रदर्शनासाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पुढील तीन वर्षांत बेस्टच्या वाणिज्य विकासासाठी उपलब्ध जागांचा उपयोग मराठी सिनेमांसाठी विशेष चित्रपटगृहे उभारण्याचा शासनाचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याचबरोबर बालचित्रपटांची दर्जेदार निर्मिती आणि त्यांचे योग्य वितरण व प्रदर्शन यासाठी विशेष योजनांची आवश्यकता अधोरेखित करत येत्या काळात सांस्कृतिक कार्य विभाग आणि महामंडळाकडून पुढाकार घेतला जाईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी याप्रसंगी दिली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या संवेदनशील व विचारी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात दिवंगत अभिनेते नाना पाटेकर आणि ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांच्या योगदानाचे स्मरण केले. चित्रपट महोत्सवांनी आपल्या कलात्मक जडणघडणीत बजावलेल्या भूमिकेचा उल्लेख करत समीक्षकांनी केलेले कौतुक, दिलेले प्रोत्साहन आणि त्यातून मिळालेली कलात्मक ऊर्जा यामुळे कलाकार म्हणून आपली वाटचाल समृद्ध झाल्याची भावना त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करत मराठी चित्रपटांच्या आशयवैभवाला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने ‘चित्रपताका’सारखे महोत्सव महत्त्वपूर्ण ठरतील, असा विश्वास व्यक्त केला. तर यावेळी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक मनोगत व्यक्त केले. यावेळी त्या म्हणाल्या की, चित्रपट हे विविध भाषा, संस्कृती आणि समाजांना जोडणारे प्रभावी माध्यम आहे. आशयघनता आणि नवनवीन प्रयोग ही मराठी चित्रपटांची महत्त्वाची वैशिष्ट्ये असून, त्यांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा महोत्सवाचा उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. यंदाच्या पर्वात ३३ चित्रपटांचे प्रदर्शन होणार असून, ‘बुक टु स्क्रीन’ हा साहित्य व चित्रपट क्षेत्र यांच्यातील दुवा सांधणाऱ्या उपक्रमासोबत १५ हून अधिक संवादसत्रे महोत्सवात होणार आहेत. महोत्सवासाठी नोंदणी शुल्कातून जमा होणारी संपूर्ण रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्यात येणार असल्याचेही व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. महोत्सवाचे संचालक पुरुषोत्तम बेर्डे यांनी प्रादेशिक भाषेतील चित्रपटांसाठी भव्य आणि एकभाषिक चित्रपट महोत्सव असण्याची गरज व्यक्त केली. त्याहृष्टीने ‘चित्रपताका’चे महत्त्व अधोरेखित करत आशयघन, प्रयोगशील आणि नवोदितांच्या मराठी चित्रपटांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न यंदाच्या पर्वात केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त चित्रनगरीच्या कार्याची आणि सुविधांची माहिती देणाऱ्या ‘चित्रदर्शन’ या माहितीपुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

थोडक्यात पण महत्वाचे



कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात कलेचे चिरंतन मूल्य जपण्याची जाणीव हवी : वासुदेव कामत

पुणे : दैनिक संध्या

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात आपण काय गमावत आहोत, याची जाणीव असली पाहिजे. निसर्गाने आपल्याला दिलेली कला ही केवळ विरंगुळा किंवा मनोरंजनासाठी नाही. कलाकृती अधिक काळाचे आयुष्य घेऊन जन्माला आलेली असते. त्यामुळे कलाकार, लेखक आणि साहित्यिकांनी आपल्या निर्मितीचा चिरंतनपणा लक्षात घेऊन विचार केला पाहिजे. आपण जे निर्माण केले आहे, ते दीर्घकाळ टिकणार आहे, याची जाणीव असणे आवश्यक आहे, असे मत चित्रकार पद्मश्री वासुदेव कामत यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या (पुणे २०२७) पूर्वतयारीनिमित्त आयोजित साहित्य रंगरेषा संमेलनात ते बोलत होते. चित्रकार सुहास बहुळकर यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. डॉ. उमा विरूपाक्ष कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी सतीश कुलकर्णी, प्रशांत कुलकर्णी, शाहीर हेमंत राजे मावळे, प्रसाद मिरासदार उपस्थित होते. समर्थ युवा फाउंडेशन संयोजित या संमेलनाला मराठी भाषा विभाग, संस्कार भारती (पश्चिम महाराष्ट्र) आणि एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ यांचे सहकार्य लाभले. पद्मश्री वासुदेव कामत म्हणाले, साहित्य आणि चित्रकारांचा पुस्तक छपाईपुरता संबंध व्यावहारिक असला, तरी व्यवसाय आणि व्यवहार इतिहासात नोंदले जात नाहीत. कलेच्या माध्यमातून आपण काय देत आहोत आणि त्यातून कोणते मार्गदर्शन होत आहे, याचे भान कलाकारांनी ठेवले पाहिजे. अन्यथा त्याचे दीर्घकाळ दुष्परिणाम होऊ शकतात, असेही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, नवरसांमध्ये बीभत्स हा एक रस आहे. प्रत्येक कलानिर्मितीमध्ये नवरसांचे प्रमाण किती ठेवावे, याची मर्यादा असते. त्याचे परिणाम सकारात्मक कसे दिसतील, याचाही विचार केला पाहिजे. डॉ. उमा कुलकर्णी म्हणाल्या, मुखपृष्ठ चित्रकार असाइनमेंट म्हणून काम करत असला, तरी तो उच्च दर्जाचा कलाकार असतो. गंभीर वाचक मुखपृष्ठ पाहून पुस्तक घेतो की नाही, हा प्रश्न असला तरी तो लेखकाचे नावही पाहतो. वाचकाला आकर्षित करण्याचे काम मुखपृष्ठ करते. त्यामुळे वाचनसंस्कृती वाढविण्याचे काम मुखपृष्ठ चित्रकार करतात. ही जबाबदारी ते वर्षानुवर्षे पेलत आले आहेत. चित्रकार सुहास बहुळकर म्हणाले, चित्रकारांचे साहित्य क्षेत्रातील योगदान खूप महत्त्वाचे आहे. अनेक प्रतिभावान चित्रकारांनी साहित्य क्षेत्रासाठी चित्रांकन केले आहे. मात्र, आधुनिक चित्रकारांच्या चर्चेत त्यांच्या योगदानाचा पुरेसा उल्लेख होत नाही. पुस्तकासाठी उत्तम चित्रांकन करणाऱ्या चित्रकाराला योग्य श्रेय मिळणे आवश्यक आहे. लेखकासोबत चित्रकाराचे नावही पुस्तकावर असले पाहिजे.

कर्मचारी भरतीबाबत बनावट जाहिरातींचे पेव; महावितरणशी संबंध नाही

पुणे : दैनिक संध्या

महावितरणमध्ये तब्बल २३ हजारांवर विविध पदांसाठी कोणतीही परीक्षा किंवा मुलाखत न घेता थेट भरती सुरू असल्याच्या खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती किंवा माहिती सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. केवळ दहावी उत्तीर्ण उमेदवारांसाठी ही भरती असल्याचे सांगत हजारो रुपयांच्या वेतनाचे आमिष दाखवले जात आहे. मात्र या सर्व जाहिराती किंवा माहिती दिशाभूल करणारी असून त्याचा महावितरणशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या नाहीत, अशा कोणत्याही बनावट जाहिरातींबाबत उमेदवारांनी सावध राहावे. सर्व पदांच्या भरती प्रक्रियेबाबतची कोणतीही अधिकृत जाहिरात किंवा वेळोवेळी दिली जाणारी माहिती ही केवळ महावितरणच्याच www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाते. उमेदवारांनी महावितरणमधील कर्मचारी भरतीबाबत कोणतीही माहिती किंवा जाहिरातीबाबत अधिकृत संकेतस्थळावर खात्री करून घ्यावी असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यासोबतच भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याची लिंक देखील महावितरणच्याच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे उमेदवारांनी फसवणूक टाळण्यासाठी सोशल मीडियावरून प्राप्त झालेल्या संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये आणि अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या व चुकीच्या माहितीवर उमेदवारांनी किंवा नागरिकांनी अजिबात विश्वास ठेवू नये असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

आयएसटीइ महाराष्ट्र-गोवा विभागीय पुरस्कारात एमएसीओइची बाजी

■ पुणे (दै. संध्या)



मराठवाडा मित्रमंडळाच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (MMCOE), पुणे या संस्थेने प्रतिष्ठेच्या ISTE (इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन) महाराष्ट्र-गोवा विभागीय पुरस्कार २०२६ मध्ये दोन मानाचे पुरस्कार पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाला ‘बेस्ट इंजिनिअरिंग कॉलेज (डिग्री)’हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाच्या प्रमुख व ISTE समन्वयक डॉ.संकीर्ती शिरवले यांना ‘बेस्ट वुमन टीचिंग फॅकल्टी’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तांत्रिक शिक्षणातील उत्कृष्ट कामगिरी,शैक्षणिक गुणवत्ता आणि संस्थात्मक विकासातील योगदानाची दखल घेत महाविद्यालयाला हा पुरस्कार देण्यात आला. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. सचिन साखरे, डॉ. संकीर्ती शिरवले, ISTE फॅकल्टी ॲडव्हायझर माधवी इंदलकर आणि डॉ. विलास बुगडे यांनी पुरस्कार स्वीकारला. डॉ. संकीर्ती शिरवले यांनी अध्यापन क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य,शैक्षणिक योगदान आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत त्यांना वैयक्तिक पुरस्काराने गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन साखरे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली संस्थेत गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन,नवे उपक्रम आणि कौशल्याधारित तांत्रिक शिक्षणाला सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे.या पुरस्कारांमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीला आणि प्राध्यापकांच्या योगदानाला विभागीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. या दुहेरी यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले.

सातत्याने भेटण्यात जिवंत राहण्याचे भाग्य मिळते – गझलकार म.भा.चव्हाण

■ पुणे (दै. संध्या)



निष्ठेने आणि सातत्याने साहित्य सम्राटचे विनोद अष्टुळ हे मराठी भाषेचे कार्यक्रम घेत असतात. साहित्य सम्राट हि संस्था नाही तर चळवळ आहे. त्यांनी आतापर्यंत नाबाद दोनशे बत्तीस कार्यक्रम घेतले आहेत. येथे जाती धर्म असे काही न पाहता माणसांचे साहित्य पाहिलं जातं. आत्ताच्या पिढीची मागणी वेगळी आहे. मराठी साहित्य जागतिक का नाही. कारण मराठी कवी काल्पनिक आणि मनोरंजनात्मक जास्त लिहितो. आपण आपल्या अक्षरांची उंची वाढवली पाहिजे. कोणी सत्कार, सन्मान करो वा ना करो आपण चांगले, कसदार, विज्ञानवादी लेखन केले पाहिजे. यापुढे पुस्तक शिल्लक राहणार नाही. फक्त माणूसच माणसाबरोबर शिल्लक राहणार आहे म्हणून जे काय द्यायचे ते जागतिक दर्जाचे असलं पाहिजे. असे विचार अध्यक्षीय मनोगतातून चव्हाण यांनी व्यक्त केले.

साहित्य सम्राट पुणे संस्थेचे नाबाद २३२ वे शब्द गोड दिवाळी कवी संमेलन साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे स्मारक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दलित स्वयंसेवक संघ मुख्यालय नेहरू स्टेडियम स्वारगेट पुणे येथे आयोजित केले होते.

कार्यक्रमासाठी कवीसंमेलनाचे अध्यक्ष म.भा.चव्हाण, प्रमुख पाहुण्या साहित्यिका सु.भा.लोंढे. ज्येष्ठ ग्रंथपाल सदानंद माळी, दैनिक केसरीचे पत्रकार अमोल भोसले, डी.एस.एस.चे.माजी.संघप्रमुख दादासाहेब सोनवणे, साहित्य सम्राट पुणेचे संस्थापक विनोद अष्टुळ आणि निवेदक रानकवी जगदीप मंचावर उपस्थित होते.

मंचावरील मान्यवरांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून साहित्यिकांचे कौतुक करून विशेष मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या सत्कार समारंभानंतर शब्द-गोड - दिवाळी कवीसंमेलन काव्य गीताने चांगलेच रंगले. प्रत्येक कवी कवयित्रींना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र आणि सत्यांश दिवाळी विशेषांक देऊन सन्मानित करण्यात आले. कला - काव्य - फराळ या विशेष वार्षिक कवी संमेलनामध्ये कवी- कवयित्री माननीय दशरथ दुनघव, बाबा ठाकूर, शाम गाडे, पार्थ धडे, श्रीराम धडे, श्रीकांत ढोबळे, रमाकांत ढोबळे, अमोल भोसले, खलील शेख, ॲड.रामचंद्र पाचुणकर, सागर सोनवणे, चांगदेव आढागळे, सुनील जोशी, ऊर्मिला पवार, वृंदा गंभीर, प्राजक्ता गंभीर, अरुण घोडके, ॲड. रमाकांत आदमाने, सु.भा.लोंढे, कांचन मून, सुजाता नानेकर, विजय जाधव, सुजित रणदिवे, सदानंद माळी, दादासाहेब सोनवणे, जगदीप वनशिव आणि विनोद अष्टुळ अशा अनेक कवी कवयित्रींनी आपल्या विविध विषयांवरिल कविता गाणी सादर करून सभागृहाची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद अष्टुळ, सुजित रणदिवे यांनी, सूत्रसंचालन जगदीश वनशिव यांनी आणि दादासाहेब सोनवणे यांनी आभार व्यक्त केले.

चित्रपटाला ‘माध्यम’ म्हणून समजून घेण्याची गरज!

सिनेअभ्यासक मिलिंद दामले यांचे प्रतिपादन | ‘चित्रपताका’त ‘अथातो सिनेजिज्ञासा’ कार्यशाळा संपन्न



■ पुणे (दै. संध्या)

पडद्यावर दिसणाऱ्या सिनेमामागे लेखनाची आणि प्रत्यक्ष निर्मितीची वर्षानुवर्षांची तपश्चर्या असते. वरवरच्या विचाराने सिनेमावर सहज टीका करणे सोपे असते, पण सिनेमा बनवणे म्हणजे एक डोंगर सर करून दुसरा डोंगर चढण्यासारखा कठीण संघर्ष असतो. त्यामुळे सिनेमावर भाष्य करताना त्या कलाकृतीमागील मेहनत ध्यानात घेणे आवश्यक आहे. तसेच सिनेमाचा ‘माध्यम’ म्हणून विचार करून त्याचा आस्वाद घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सिनेअभ्यासक मिलिंद दामले यांनी केले. ‘चित्रपताका’ महोत्सवात सोमवारी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने आयोजित ‘चित्रपताका’ हा महाराष्ट्र शासनाचा अधिकृत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचा मराठी चित्रपट महोत्सव रविवारपासून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलात सुरू आहे. या चार दिवसीय महोत्सवात सोमवारी ‘अथातो सिनेजिज्ञासा’ ही एफटीआयआय, पुणे येथील सहप्राध्यापक व सिनेअभ्यासक मिलिंद दामले यांची कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी सिनेमा माध्यमाचा सखोल परिचय करून घेण्याची गरज अधोरेखित करताना मिलिंद दामले म्हणाले की, चित्रपटविषयक लेखन, समीक्षा, वृत्तांकन, मुलाखती आणि चित्रपटांची प्रसिद्धी करताना सिनेमा व प्रसारमाध्यम यांच्यातील परस्परसंबंध आणि सिनेमाचे माध्यम म्हणून असलेले निरनिराळे पैलू समजून घ्यायला हवेत. मुंबईत १३० वर्षांपूर्वी सिनेमाचा पहिला खेळ आयोजित केला गेला, तेव्हापासून सिनेमा ही कला आपल्या इथे रुजली आहे. आज भारत हा जगात सर्वाधिक चित्रपट बनवणारा देश बनला आहे.

पण सिनेमाकलेकडे पाहताना माध्यम म्हणून त्याचा परिचय करून घ्यायला हवा. सिनेमात सर्व कलांचा मेळ असतो आणि सिनेमाच्या निर्मितीमागे एक विचार असतो. त्यातून माध्यम म्हणून सिनेमाध्यमाला विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले असून ते सतत बदलत, उत्क्रांत होत आहे. ही प्रक्रिया जाणून घेतली, तर सिनेमा केवळ ‘पाहण्या’पेक्षा त्याचा खऱ्या अर्थाने आस्वाद घेतला जाईल, असे मत मिलिंद दामले यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, महोत्सवाचे संचालक पुरुषोत्तम बेर्डे, महोत्सवाचे क्युरेटर डॉ. संतोष पाठारे यांच्यासह सिनेरसिक उपस्थित होते.

सिनेमाच्या ध्वनी-संगीतावर ‘चित्रपताका’त धडे!

चित्रपटाच्या अनुभवाला समृद्ध करणाऱ्या ध्वनीसंकलन आणि संगीतरचनेच्या प्रक्रियेची ओळख करून देणारी ‘स्वर-नाद-निनाद’ ही प्रसिद्ध ध्वनीसंकलक मंदार कमलापूरकर यांची कार्यशाळा सोमवारी ‘चित्रपताका’त संपन्न झाली. चित्रपटांतील ध्वनींची निवड, त्यांचे संकलन आणि संगीताची निर्मिती यांमागील तांत्रिक व कलात्मक पैलू कमलापूरकर यांनी या सत्रात उलगडले. संगीत हा ध्वनीचा प्रभावी प्रकार असून तो वय आणि लिंग यांसारख्या भेदांच्या पलीकडे जाऊन प्रत्येक व्यक्तीशी जोडला जातो, असे सांगत त्यांनी माणसाच्या आयुष्यात आवाजाचे महत्त्व अधोरेखित केले. शोले, तुंबाड, घरत गणपती, धर्मवीर यांसारख्या सिनेमांतील आणि विविध जाहिरातींतील दृश्यांच्या उदाहरणाद्वारे त्यांनी ध्वनीमुळे दृश्याचा मूड, भावना आणि परिणाम कशाप्रकारे बदलतात, हे स्पष्ट केले. या सत्रातून चित्रपटाच्या प्रभावी सादरीकरणामध्ये ध्वनीसंयोजनाची महत्त्वपूर्ण भूमिका मंदार कमलापूरकर यांनी समजून सांगितली.

नगरकर ज्वेलर्सच्या ‘लकी ड्रॉ’मध्ये विजेत्यांना इलेक्ट्रीक कार, दुचाकी व आयफोन

■ पुणे (दै. संध्या)



■ बाणेरच्या दालनात विशेष कार्यक्रमाचे आयोजन

■ पहिल्याच ‘लकी ड्रॉ’ला ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद

मॉलमध्ये, पेट्रोल पंपावर किंवा एखाद्या दुकानात आपणही 'लकी ड्रॉ''चे कूपन भरतो आणि नंतर आपण ते विसरुनही जातो. पण काही दिवसांनी ध्यानीमनी नसताना कार किंवा दुचाकी जिंकल्याचा फोन आल्यावर होणारा आनंद स्वप्नवत असतो, तसेच दृश्य रविवारी एस. एस. नगरकर ज्वेलर्सच्या 'लकी ड्रॉ''मध्ये पाहायला मिळाले. आपल्याला कार, दुचाकी आणि आयफोन मिळाला, यावर काही क्षण त्यांचा विश्वासच बसेना; पण खात्री झाल्यावर आनंद गगनात मावेनासा झाला. नगरकर ज्वेलर्सच्या तुळशीबाग, लक्ष्मी रोड, कोथरुड, ठाणे, बाणेर अशा पाचही दालनांमध्ये हा लकी ड्रॉ ठेवण्यात आला होता. २४ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत खरेदी करणाऱ्या आणि कूपन्स भरणाऱ्यांना यामध्ये सहभागी होता आले. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी बाणेरच्या दालनात अतिशय पारदर्शकपणे या लकी ड्रॉचा निकाल लावण्यात आला. यामध्ये ठाणे, कोथरुड आणि बाणेरच्या दालनांमध्ये खरेदी करुन कूपन भरलेल्या ग्राहकांनी बाजी मारली. यामध्ये पहिले बक्षीस टाटा टिआगो इलेक्ट्रीक कार डॉ. अर्चना पवार (ठाणे दालन) यांना, दुसरे बक्षीस इलेक्ट्रीक अक्सेस दुचाकी डॉ. आसावरी कानडे (कोथरुड दालन) यांना, तर तिसरे बक्षीस आयफोन १७ सोनाली बागडे (बाणेर दालन) यांना मिळाले. ही बक्षिसे जाहीर झाल्यानंतर संबंधित विजेत्यांना दूरध्वनीद्वारे कळवण्यात आले. यावेळी नगरकर ज्वेलर्सचे संचालक वसंत नगरकर, स्वाती वल्लभ नगरकर, वासंती वसंत नगरकर, प्रसाद नगरकर, पुष्कर नगरकर, पूजा नगरकर कुलकर्णी, रोहन कुलकर्णी उपस्थित होते. या 'लकी ड्रॉ''बाबत बोलताना पुष्कर नगरकर म्हणाले, 'लकी ड्रॉ''चे हे पहिलेच वर्ष होते; तरीही ग्राहकांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दसरा दिवाळीआधी सोन्याचा दर जास्त होता; पण सणासुदीला त्यात घट झाल्याने खरेदीचे प्रमाण वाढले. ग्राहकांनी सोने, सोन्याचे दागिने तसेच चांदीचीही खरेदी केली. सणवार, लग्नसराई या निमित्ताने या काळात खरेदीचे प्रमाण वाढलेले असल्याने आम्ही आता लकी ड्रॉ जाहीर केला. वाढते प्रदूषण, इंधनाची वाढती किंमत याचा विचार करुन बक्षीस म्हणून इलेक्ट्रीक गाडी देण्याचा विचार केला. याशिवायही दालनात ठराविक रकमेची खरेदी करणाऱ्यांसाठी 'स्पिन टू विन' अशी खास ऑफर देण्यात आली होती, ज्यामध्ये ग्राहकांनी घड्याळ, डीनर सेट, पाण्याची बाटली यांसारखी विविध बक्षिसे जिंकली. प्रसाद नगरकर म्हणाले, बाणेरचे शोरुम दोन महिन्यांपूर्वीच सुरु करण्यात आले. मात्र येथील ग्राहकांनी अनपेक्षित प्रतिसाद देत नगरकर ज्वेलर्सवर भरभरुन प्रेम केले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



कलागुणांची कदर करून दिलीप डहाके यांनी श्रेष्ठत्व सिद्ध केले : डॉ. रवींद्र भोळे

पिंपरी-चिंचवड : दैनिक संध्या

समाजासाठी आपल्या आयुष्यातील अमूल्य वेळ समर्पित करून विविध क्षेत्रांत नवनिर्मितीचा ध्यास घेणाऱ्या ध्येयवेड्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करणे, हा अत्यंत प्रेरणादायी उपक्रम आहे. अशा पुरस्कारांमुळे समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळते आणि सुदृढ राष्ट्रनिर्मितीला बळ मिळते. छंद सम्राटांच्या कलागुणांची आणि कार्याची योग्य कदर करून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप गोविंदराव डहाके यांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे यांनी केले. पिंपरी-चिंचवड येथील सायन्स पार्कमध्ये छंद सम्राट सामाजिक संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय 'छंद सम्राट पुरस्कार सोहळ्या'चे आयोजन करण्यात आले होते. समाजासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सेवाव्रती कार्यकर्त्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री गिरीश प्रभुणे हे होते. त्यांच्या हस्ते ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांना 'कार्य महर्षी छंद सम्राट पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. भोळे म्हणाले की, समाजासाठी त्याग करण्याची वृत्ती, इतरांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची संवेदनशीलता, योद्ध्याप्रमाणे ध्येयासाठी झटण्याची जिद्द आणि शास्त्राचा अभ्यास करण्याची वृत्ती ही श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांची लक्षणे आहेत. अशा गुणांचा सन्मान करणारे आणि समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना प्रोत्साहन देणारे उपक्रम समाजाच्या जडणघडणीसाठी महत्त्वाचे आहेत. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी-चिंचवड महापालिकेचे विरोधी पक्षनेते तथा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, सायन्स पार्कचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण तुपे, अखिल भारतीय साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवडचे अध्यक्ष राजन लाखे, प्रसिद्ध हार्मोनियमवादक राजीव परांजपे, सायन्स पार्कच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रद्धा खामप्रिया, उद्योजक तेजस शेठ शिंदे, अक्कलकोटचे उपनगराध्यक्ष राजू क्षीरसागर, अनिल बडगुजर, सूर्यकांत सोनार, ज्येष्ठ समाजसेवक संभाजी बारणे, राजेंद्र मगर, अमोल पाटील आणि चंद्रकांत पुराणिक आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन छंद सम्राट सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप गोविंदराव डहाके यांनी केले. संस्थेचे उपाध्यक्ष संतोष काळे, सचिव दीपक पाटील आणि कार्यवाहक प्रतीक अली वागकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. संग्राम पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी राज्यभरातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले छंद सम्राट मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सीआयआय तर्फे पुण्यात 'नेक्स्टजेन मोबिलिटी शो' आणि 'सरफेस कोटिंग शो २०२६'

पुणे : दैनिक संध्या

भारताला जागतिक स्तरावरील उत्पादन आणि मोबिलिटी क्षेत्रातील आघाडीचे केंद्र बनविण्याच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू असताना, द कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) पश्चिम विभागातर्फे चौथ्या 'सीआयआय नेक्स्टजेन मोबिलिटी शो २०२६' आणि 'सीआयआय सरफेस कोटिंग शो २०२६'चे आयोजन १९ ते २१ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये करण्यात आले आहे. पाच हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळावर होणाऱ्या या प्रदर्शनांना आठ हजारांहून अधिक लोक भेट देतील, अशी अपेक्षा आहे. उत्पादन, तंत्रज्ञान, संशोधन आणि धोरणनिर्मिती क्षेत्रातील प्रमुख घटकांना एकत्र आणणारे हे प्रदर्शन मोबिलिटीचे भविष्य, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान आणि शाश्वत औद्योगिक विकासाला दिशा देणाऱ्या नव्या संकल्पना आणि उपाययोजना सादर करणार आहे. 'स्पीड, स्केल, सस्टेनेबिलिटी' (वेग, विस्तार आणि शाश्वतता) या संकल्पनेवर आधारित 'नेक्स्टजेन मोबिलिटी शो'मध्ये इलेक्ट्रिक वाहने, बॅटरी तंत्रज्ञान, ऑटोमोबाईल इलेक्ट्रॉनिक्स, सॉफ्टवेअर आधारित वाहने, कनेक्टेड मोबिलिटी, पर्यायी इंधने आणि स्मार्ट उत्पादन प्रणाली यांमधील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रदर्शन होणार आहे. याचवेळी आयोजित चौथ्या 'सीआयआय नेक्स्टजेन मोबिलिटी समिट'मध्ये व्हॉरॉक, स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया, टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी, ब्रिजस्टोन इंडिया, युनो मिंडा, यझाकी इंडिया आणि एआरएआय यांसारख्या संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन, पुरवठा साखळीची सक्षम व्यवस्था, पुरवठादारांची स्पर्धात्मकता आणि जागतिक ऑटोमोबाईल मूल्य साखळीतील भारताची वाढती भूमिका या विषयांवर यावेळी चर्चा होईल. यासोबतच 'कोटिंग द फ्युचर : इनोव्हेशन, सस्टेनेबिलिटी अँड डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन' या संकल्पनेवर आधारित 'सीआयआय सरफेस कोटिंग शो २०२६'मध्ये औद्योगिक कोटिंग्ज, करोजन प्रोटेक्शन तंत्रज्ञान, सरफेस इंजिनिअरिंग, ऑटोमेशन आणि प्रगत मटेरियल्स क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान मांडण्यात येणार आहे. चौथ्या 'सीआयआय सरफेस कोटिंग समिट'मध्ये जीई एअरोस्पेस, आयआयटी बॉम्बे, आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया, टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स, चुगोकू पेंट्स इंडिया आणि श्री रसायनी या संस्थांमधील तज्ज्ञ सहभागी होतील. कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स आणि स्मार्ट कोटिंग्ज यांसारख्या तंत्रज्ञानामुळे औद्योगिक उत्पादकता, कार्यक्षमता आणि शाश्वततेमध्ये कशा प्रकारे परिवर्तन घडत आहे.

राष्ट्रीय पत्रकार दिनानिमित्त बारामतीत भव्य रक्तदान शिबिर

- ६७ रक्तदात्यांचे रक्तदान!
- बारामती पोलीस प्रशासन आणि बारामती पत्रकार बांधवांचा स्तुत्य उपक्रम
- सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद



■ बारामती (दै. संध्या)

राष्ट्रीय पत्रकार दिनाचे औचित्य साधून बारामती शहर पोलीस ठाणे आणि बारामती पत्रकार यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.१६ नोव्हेंबर) बारामती शहर पोलीस ठाण्याच्या परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला पोलीस अधिकारी, कर्मचारी,पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण ६७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.या रक्तदान शिबिराचे उद्घाटन बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव,बारामती उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा ओमासे आणि बारामती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रीय पत्रकार दिन हा केवळ पत्रकारितेच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस नसून, समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित करण्याचीदेखील संधी आहे. याच भावनेतून बारामती पोलीस प्रशासन आणि पत्रकार बांधवांनी एकत्र येत रक्तदान शिबिराचा उपक्रम राबविला.रक्तदान हे श्रेष्ठदान असून,गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्ताचा तुटवडा भासू नये,या सामाजिक उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसह पत्रकार बांधव, विविध सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते आणि राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रक्तदान करण्यासाठी अनेकांनी पुढाकार घेत सामाजिक एकतेचा आणि माणुसकीचा संदेश दिला. विशेष म्हणजे पत्रकार दिनाचे औचित्य साधून पत्रकारांनी केवळ लेखणीच्या माध्यमातूनच नव्हे,तर प्रत्यक्ष कृतीतूनही सामाजिक बांधिलकी जपल्याचे या उपक्रमातून दिसून आले.दरम्यान,बारामती उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम तसेच ॲड.रमेश कोकरे आणि ॲड.गोविंद देवकाते यांनी रक्तदान शिबिराला भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले व या सामाजिक उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. पोलीस प्रशासन आणि पत्रकार बांधवांनी एकत्र येत आयोजित केलेल्या या उपक्रमामुळे राष्ट्रीय पत्रकार दिनाला सामाजिक सेवेची जोड मिळाली.६७ रक्तदात्यांनी केलेल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णांना मदतीचा हात मिळणार असून,समाजात रक्तदानाविषयी जनजागृती करण्याचा सकारात्मक संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.या स्तुत्य उपक्रमाचे बारामती शहरातून कौतुक होत आहे.

फॉरएव्हर52 आणि भूमिका बहल यांची भागीदारी

■ पुणे (दै. संध्या)



आपल्या शहराच्या किंवा गावाच्या पलीकडे जाऊन मेकअप कलेचा विस्तार करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मेकअप कलाकारांसाठी आता आंतरराष्ट्रीय स्तरावर शिकण्याची एक अनोखी संधी उपलब्ध झाली आहे. फॉरएव्हर52 ने अकॅडेमिक बाय फॉरएव्हर52 या उपक्रमांतर्गत देशव्यापी मेकअप टॅलेंट स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेतील एका विजेत्याला दुबईला जाण्याची, आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्टकडून प्रशिक्षण घेण्याची तसेच भारतातील सुप्रसिद्ध मेकअप प्रशिक्षक भूमिका बहल यांच्यासोबत प्रशिक्षण घेऊन नवे कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे. दुबई टूर स्पर्धेमध्ये भारतभरातील मेकअप आर्टिस्ट, मेकअपचे विद्यार्थी, नवशिके तसेच ब्युटी कंटेंट क्रिएटर्स यांना आपली कलात्मकता आणि कौशल्ये सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी अकॅडमिक बाय फॉरएव्हर52 चे किमान एक उत्पादन वापरून स्वतःचा एक आकर्षक आणि नाविन्यपूर्ण मेकअप लूक तयार करणे आवश्यक आहे. तसेच, मेकअपसंदर्भातील एक व्यावसायिक टिपही शेअर करावी लागेल. यातून चार उपांत्य फेरीतील स्पर्धकांची निवड केली जाईल आणि त्यापैकी एका स्पर्धकाची महाविजेता म्हणून निवड होईल.

एअरटेल ग्राहकांना ₹३० हजारांहून अधिक किमतीचे रिवॉर्ड्स

- 'एअरटेल इनसाइडर'द्वारे विविध ब्रँड्सच्या आकर्षक ऑफर्स
- प्रीमियम सबस्क्रिप्शन, शॉपिंग डील्स, प्रवास, खाद्यपदार्थ आणि मनोरंजन क्षेत्रातील विविध सवलती एकाच व्यासपीठावर उपलब्ध



■ नवी दिल्ली (दै. संध्या)

एअरटेल ग्राहकांसाठी कंपनीने 'एअरटेल इनसाइडर' या उपक्रमाच्या माध्यमातून आकर्षक रिवॉर्ड्स आणि विशेष ऑफर्स उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रीमियम सबस्क्रिप्शन, शॉपिंग डील्स, प्रवास, खाद्यपदार्थ आणि मनोरंजन अशा विविध क्षेत्रांतील आघाडीच्या ब्रँड्सच्या ऑफर्सचा लाभ ग्राहकांना एकाच ठिकाणी घेता येणार आहे. या सर्व ऑफर्सचे एकत्रित मूल्य ३० हजार रुपयांहून अधिक असल्याचा कंपनीचा दावा आहे.

एअरटेलचे कनेक्शन ग्राहकांना केवळ दूरसंचार सुविधा देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या दैनंदिन जीवनात अतिरिक्त फायदे मिळवून देणारे ठरत आहे. 'एअरटेल इनसाइडर'च्या माध्यमातून ग्राहकांना विविध ब्रँड्स आणि सेवांशी संबंधित आकर्षक सवलती व रिवॉर्ड्सचा लाभ घेता येणार आहे. एअरटेल इनसाइडरमागील संकल्पना म्हणजे एअरटेल ग्राहकांना केवळ कनेक्टिव्हिटीच नव्हे, तर त्यापलीकडेही अधिक मूल्य मिळवून देणे. डुओलिंगोच्या माध्यमातून नवीन भाषा शिकणे, क्रोमामधून गॅजेट्सची खरेदी करणे, सिनेपोलिसमध्ये चित्रपटांचा आनंद घेणे किंवा पॉकेट एफएमवर मनोरंजनाचा अनुभव घेणे, अशा विविध गरजा आणि आवडीनिवडींनुसार ग्राहकांना ऑफर्सचा लाभ घेता येणार आहे.

एअरटेल इनसाइडरवरील प्रमुख ऑफर्स

१. शिक्षण आणि सबस्क्रिप्शन – डुओलिंगो सुपर डुओलिंगोचे १२ महिन्यांचे सबस्क्रिप्शन, ज्याचे मूल्य ३,१२० रुपये आहे.

२. शॉपिंग आणि गॅजेट्स – क्रोमा आयफोन १५, १६ आणि १७ मालिकेतील निवडक मॉडेल्सच्या खरेदीवर क्रोमा किंवा ॲपलमार्फत २३ हजार रुपयांपर्यंत बचतीची संधी.

३. मनोरंजन – पॉकेट एफएम पॉकेट एफएम प्रीमियमचे तीन महिन्यांचे सबस्क्रिप्शन.

४. मनोरंजन – सिनेपोलिस दोन चित्रपटांची तिकिटे खरेदी केल्यास एक तिकीट मोफत मिळणार असून, यामध्ये १५० रुपयांपर्यंत सवलत मिळू शकते.

रोमानोव्हने फिस्टी ग्वावा चिली लाँच करत आपल्या फ्लेव्हर्ड व्होडका पोर्टफोलिओचा विस्तार केला

■ नवी दिल्ली (दै. संध्या)



रोमानोव्ह व्होडका या इनब्रू बेव्हरेजेसच्या भारतातील सर्वाधिक पसंती मिळवणाऱ्या व्होडका ब्रँडने महाराष्ट्रात फिस्टी ग्वावा चिली फ्लेव्हर्ड व्होडका लाँच करून आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण फ्लेव्हर आणला आहे. पेरूच्या गोडव्याची सांगड मिरचीच्या ठसक्याशी घालणारा हा नवीन व्हेरियंट स्वादांचा अनोखा मेळ साधतो, ज्यामुळे रोमानोव्हच्या विस्तारत चाललेल्या फ्लेव्हर्ड व्होडका पोर्टफोलिओमध्ये वेगळा पर्याय जोडला गेला आहे. हे लाँच बाजारपेठेत ताज्या आणि समकालीन उत्पादनांची भर घालून आजच्या ग्राहकांसाठी स्वादाचा अनुभव नव्याने परिभाषित करण्याबाबत रोमानोव्हची कटिबद्धता अधिक दृढ करते. आकर्षक गुलाबी रंगछटा आणि आधुनिक पॅकेजिंगसह फिस्टी ग्वावा चिली ब्रँडच्या फ्लेव्हर्ड व्होडका पोर्टफोलिओला वैशिष्ट्यपूर्ण दृश्य ओळख प्रदान करतो. आपल्या 'रेडी व्हेन यू आर' तत्त्वज्ञानाशी बांधील राहत रोमानोव्ह सहजपणे आनंद घेता येईल अशा व्होडका अनुभवाला प्रोत्साहन देते, जो विविध प्रसंगांमध्ये आणि ग्राहकांच्या पसंतीशी सहज जुळवून घेतो. त्याची वैविध्यता आणि सहज मिसळण्याची क्षमता ग्राहकांसाठी सुलभ पर्याय ठरते, मग ती दैनंदिन मिक्सर्ससोबत सहज मिसळायची असो किंवा विविध कॉकटेल्ससाठी बेस म्हणून वापरायची असो. या लाँचबाबत मत व्यक्त करत इनब्रू बेव्हरेजेसचे मार्केटिंगचे जनरल मॅनेजर श्री. सुमित तिवारी म्हणाले, "आमच्या व्हाईट स्पिरिट्स पोर्टफोलिओमध्ये नावीन्यतेला चालना देताना आम्ही ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडींवर आधारित फ्लेव्हर कॉम्बिनेशन्स सादर करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. पेरू आणि मिरची हे समीकरण भारतीय चवीसाठी जुन्या आठवणींना उजाळा देणारे कॉम्बिनेशन आहे, जे मिरचीच्या ठसक्यासह पेरूच्या गोडव्याचा आस्वाद घेण्याच्या परिचयाच्या आठवणी ताज्या करते. रोमानोव्ह फिस्टी ग्वावा चिली हेच लोकप्रिय फ्लेव्हर कॉम्बिनेशन घेऊन आले आहे आणि आमच्या फ्लेव्हर्ड व्होडका श्रेणीसाठी रंजक पर्याय तयार करते. या लाँचसह, आम्ही पोर्टफोलिओमध्ये आणखी एक वेगळे वैशिष्ट्य जोडत आहोत आणि भारतातील बाजारपेठेत रोमानोव्हचे स्थान अधिक दृढ करत आहोत."

स्माईल फाउंडेशन आणि बर्जर पेंट्सचा कौशल्य विकास उपक्रमाचा विस्तार


■ पुणे (दै. संध्या)




घरगुती रंगकाम करणाऱ्या कामगारांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी स्माईल फाउंडेशन आणि बर्जर पेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'आयट्रेन ऑन व्हील्स' या कौशल्य विकास उपक्रमाचा पुणे आणि परिसरात विस्तार करण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे कामगारांना त्यांच्या परिसरातच मोफत तांत्रिक प्रशिक्षण दिले जात आहे. गेल्या चार वर्षांत देशभरातील ५.४८ लाख रंगकाम करणाऱ्या कामगारांना या उपक्रमाचा लाभ झाला आहे. देशातील २७ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधील ४१२ जिल्ह्यांत २७ फिरती प्रशिक्षण वाहने कार्यरत आहेत. प्रशिक्षणामुळे कामगारांच्या उत्पन्नात अंदाजे ६० ते ७० टक्क्यांनी वाढ झाल्याचे क्षेत्रीय निरीक्षणांतून समोर आले आहे. पुण्यात आतापर्यंत ८६१ प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली असून, २४ हजार २५२ कामगारांनी प्रशिक्षण घेतले आहे. आता हिंजवडी, मान, मारुंजी, वाकड, शेवाळेवाडी, खराडी, लोहगाव आणि वाघोली या भागांत उपक्रमाचा विस्तार करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील दुसरा प्रशिक्षण प्रकल्प नागपूर येथे तीन महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आला आहे. या प्रशिक्षणात अंतर्गत व बाह्य रंगकाम, वॉटरप्रूफिंग, टेक्स्चर पेंटिंग, लाकडावरील रंगकाम, पृष्ठभागाची पूर्वतयारी, आधुनिक रंगकाम पद्धती आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा समावेश आहे. सैद्धांतिक मार्गदर्शनासोबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे कामाचा दर्जा सुधारण्याबरोबरच कामगारांना अधिक उत्पन्नाच्या संधी उपलब्ध होत आहेत.

रोबोटिक शस्त्रक्रिया कर्करोग उपचारांची दिशा कशी बदलत आहे?

■ नवी दिल्ली (दै. संध्या)





वैद्यकीय तंत्रज्ञानातील वेगवान प्रगतीमुळे कर्करोग उपचारांच्या पद्धतींमध्ये मोठे बदल घडत आहेत. आधुनिक सर्जिकल ऑन्कोलॉजीमध्ये रोबोटिक-असिस्टेड सर्जरी ही एक महत्त्वपूर्ण प्रगती म्हणून उदयास येत आहे. अनुभवी सर्जनचे कौशल्य आणि प्रगत रोबोटिक प्रणाली यांचा एकत्रित वापर केल्यामुळे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अधिक स्पष्ट दृश्यता, अधिक अचूकता आणि शस्त्रक्रियेच्या उपकरणांवर उत्तम नियंत्रणासह करणे शक्य होत आहे. कर्करोग उपचारांमध्ये तंत्रज्ञानाच्या वाढत्या भूमिकेबद्दल बोलताना, डॉ. स्निता सिनुकुमार, वरिष्ठ सल्लागार – सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट आणि हायपेक विशेषज्ञ, अपोलो हॉस्पिटल्स पुणे, म्हणाल्या: "रोबोटिक-असिस्टेड सर्जरीच्या विकासामुळे सर्जिकल ऑन्कोलॉजीच्या क्षेत्रात अनेक नवीन शक्यता निर्माण झाल्या आहेत. अधिक स्पष्ट दृश्यता, उपकरणांची लवचिकता आणि अचूकतेमुळे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अधिक चांगल्या नियंत्रणासह करणे शक्य होते. तंत्रज्ञान हे सर्जनला मदत करणारे एक साधन आहे. मात्र, रुग्णांना सर्वोत्तम उपचार परिणाम मिळवून देण्यासाठी सर्जनचे वैद्यकीय कौशल्य, योग्य निर्णयक्षमता आणि प्रत्येक रुग्णासाठी वैयक्तिक उपचार पद्धती हेच सर्वात महत्त्वाचे घटक आहेत." रोबोटिक-असिस्टेड सर्जरीमध्ये सर्जनला शस्त्रक्रिया केल्या जाणाऱ्या भागाचे मोठे, हाय-डेफिनिशन आणि त्रिमितीय (३डी) दृश्य दिसते. तसेच विशेष उपकरणांमुळे शस्त्रक्रिया अधिक अचूकपणे आणि कुशलतेने करता येते. या शस्त्रक्रिया शरीरावर लहान छेद देऊन केल्या जातात. सर्जन एका विशेष कन्सोलवर बसून रोबोटिक उपकरणांचे संपूर्ण नियंत्रण करतात. योग्यरित्या निवडलेल्या रुग्णांमध्ये ही मिनिमली इनवेसिव्ह पद्धत रक्तस्राव, शस्त्रक्रियेनंतर होणारा त्रास आणि रुग्णालयातील वास्तव्याचा कालावधी कमी करण्यास मदत करू शकते. तसेच रुग्णांची प्रकृती लवकर सुधारण्यासही सहाय्य होऊ शकते. रोबोटिक तंत्रज्ञानाचे फायदे युरोलॉजिकल ऑन्कोलॉजीमध्येही महत्त्वपूर्ण आहेत. विशेषतः प्रोस्टेट, किडनी आणि मूत्राशयाच्या कर्करोगाशी संबंधित शस्त्रक्रियांमध्ये याचा मोठा उपयोग होतो. अधिक अचूकता आणि उपकरणांच्या लवचिकतेमुळे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणे शक्य होते. यामुळे आजूबाजूच्या निरोगी ऊतींचे आणि शक्य असेल तेथे संबंधित अवयवांच्या कार्याचे संरक्षण करण्यास सर्जनना मदत मिळते. अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथे डॉ. मोहम्मद अली, युरोलॉजिकल ऑन्कोलॉजी, रोबोटिक आणि लॅप्रोस्कोपिक सर्जरीमध्ये विशेष प्राविण्य असलेले युरोलॉजिस्ट, या प्रगत शस्त्रक्रिया पद्धतींमधील आपले कौशल्य रुग्णांना उपलब्ध करून देतात. अपोलो हॉस्पिटल्स पुणे येथे दा विंची एक्सआय रोबोटिक सर्जिकल सिस्टीमसह प्रगत शस्त्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

विशेषीकृत कर्करोग उपचारांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि नवकल्पनांची वाढती भूमिका यामधून अधोरेखित होते. याशिवाय, रुग्णांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन रुग्णालयात पेरिटोनियल सरफेस मॅलिग्नन्सी क्लिनिक सुरू करण्यात आले आहे. या क्लिनिकच्या माध्यमातून पोटाच्या आतील आवरणावर परिणाम करणाऱ्या गुंतागुंतीच्या कर्करोगांचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन करण्यासाठी विशेष वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

पुण्यश्लोक 300

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: dg@barti.in
जा.क्र./बार्टी/ई-निविदा/बार्टी/प्र.व.प्र./कार्यक्रम-ठेका/२०२६-२७/७०५६ दिनांक:-०६/११/२०२६

अल्पमुदतीची निविदा सूचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेमार्फत दि. ०६ डिसेंबर, २०२६ महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी दादर मुंबई येथे अभिवादन पर कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. सदर दिनी महाराष्ट्रासह देशभरातून लाखोच्या संख्येने अनुयायी येत असतात. त्या अनुषंगाने, दि. ०६ डिसेंबर, २०२६ रोजी मंडप उभारणी, घडीपत्रिका, सोशल मिडिआ लाईव्ह प्रक्षेपण फेसबुक, युट्युब व विविध चॅनेलवर प्रसारण इत्यांदीचा पुरवठा करण्याकरीता अल्पमुदतीची ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

कामाचे स्वरुप	अंदाजीत किंमत	निविदा शुल्क	बयाणा रक्कम
बार्टी, पुणे संस्थेमार्फत दि. ०६ डिसेंबर, २०२६ रोजी चैत्यभुमी दादर, मुंबई येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभुमी दादर, मुंबई येथे अभिवादनपर कार्यक्रमास आवश्यक साहित्याचा पुरवठा करणेबाबत.	५२,५६,५४६/- (GST सह)	२०,०००/-	२,००,०००/-

१. निविदा, निविदेच्या सूचना, अटी, शर्ती व शुध्दीपत्रक https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक दि.०६/११/२०२६, सायं. ०५:०० वा. ते दि. १८/११/२०२६, दु. १२.०० वा. वाजेपर्यंत या कालावधीत उपलब्ध राहतील.
२. निविदा सादर करु इच्छिणाऱ्या पुरवठादाराने त्याची नोंदणी https://mahatenders.gov.in येथे करावी.
३. ई-निविदा भरतेवेळी जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ई-निविदा शुल्क रुपये २०,०००/-क्रेडीट कार्ड/डेबीट कार्ड/नेटबँकींगव्दारे ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे.
४. बयाणा रक्कम २,००,०००/- क्रेडीट कार्ड/डेबीट कार्ड/नेट बँकींग/आर.टी.जी. एस (R.T.G.S)/एन.ई.एफ.टी (NEFT) च्या व्दारे ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे.
५. इंटरनेट, विद्युत पुरवठा किंवा संगणक बिघाडामुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी बार्टी संस्थेवर राहणार नाही.

Sd/-
महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C३८५९

थोडक्यात पण महत्वाचे



भारतीय महिलांमध्ये रुजलेली मूल्ये अतुलनीय - स्वामी गोविंद देव गिरी

पिंपरी: दैनिक संध्या

भारतीय परंपरेत सूर्य नारायणाच्या उपासनेला अत्यंत महत्त्व आहे. माता, भगिनींनी ही आपली भारतीय संस्कृती जपली आहे. माता, भगिनी उपासनेसाठी उत्सुक असतात आणि त्यांची देवावर अढळ श्रद्धा असते. या मातांच्या सद्गुणांमुळेच यशस्वी पती, पत्नी घडतात. भारतीय महिलांमध्ये रुजलेली मूल्ये अतुलनीय आहेत. देवी सीता आणि सावित्री या आमच्या आदर्श आहेत. जे सद्गुण पाळणाऱ्यांचे दर्शन घेतात, त्यांना पुण्य मिळते. छटपूजेच्या निमित्ताने आज विश्व श्रीराम सेनेच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात इंद्रायणी नदीच्या काठावर मला एका भव्य दिव्य दृश्याचे दर्शन झाले. पूजा आणि श्रद्धेचा असा सागर पाहून माझे हृदय भरून आले असल्याचे अयोध्या येथील श्रीराम मंदिराचे विश्वस्त स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी सांगितले. रविवारी, (दि. १५) विश्व श्री राम सेनेच्या वतीने मोशी, इंद्रायणी नदीच्या घाटावर भव्य छटपूजा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्वामी गोविंददेव गिरी महाराजांच्या हस्ते भव्य गंगा आरती करण्यात आली. यावेळी विश्व श्रीराम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. लालबाबू गुप्ता यांनी स्वागत केले. स्वामी भरतानंद महाराज, आचार्य देशपांडे, नगरसेवक यश साने, कुंदन गायकवाड आणि निखिल बोराटे यांच्यासह सुमारे १५ हजार उत्तर भारतीय बंधू भगिनी उपस्थित होते. पवित्र तीर्थस्थान काशी येथून आलेल्या पुरोहितांनी भव्य गंगा आरती ने उपस्थितांच्या डोळ्याचे पारणे फिटले. सर्वांनी घाटावर छठ मातेची पूजा आणि प्रार्थना केली. डॉ. लालबाबू गुप्ता यांनी महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांसाठी मुख्यमंत्री मदत निधी करिता स्वामी गोविंददेव गिरी महाराजांकडे एक लाख एक हजार रुपयांचा धनादेश यावेळी सुपूर्द केला. छठ मातेच्या भक्तीगीतांनी आणि मातांच्या छठ गीतांनी इंद्रायणी नदीचा काठ भक्तीच्या सागरात न्हाऊन निघाला. स्वामी गोविंददेव गिरी महाराज पुढे म्हणाले की, ज्ञानेश्वर माऊली या पवित्र इंद्रायणी तीरावर आळंदी मध्ये समाधीस्थ आहेत. माऊली म्हणजे आई. आपण सर्व भारत मातेचे पुत्र आहोत. देशातील सर्व आपल्या माता कुटुंबाच्या सुख समृद्धीसाठी छठ मातेची पूजा करतात. या माता, भगिनींना मी वंदन करतो. आपण भारतमातेची सेवा आणि देशाची प्रगती अशीच चालू ठेवूया. छठ माता तुमच्या इच्छा पूर्ण करो असे शुभ आशीर्वाद स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी दिले.

भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाला नवे हायटेक रूप; प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

पिंपरी : दैनिक संध्या

भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचे नूतनीकरण करून त्याला अत्याधुनिक स्वरूप देण्यात आले आहे. मोरवाडी येथील एम.एस.आर. कॅपिटलमध्ये उभारण्यात आलेल्या या नूतनीकृत कार्यालयाचे उद्घाटन भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्रदादा चव्हाण यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. फीत कापून आणि दीपप्रज्वलन करून नव्या कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले. या नव्या कार्यालयामुळे शहर भाजपच्या संघटनात्मक कामकाजाला नवी दिशा मिळणार असून कार्यकर्त्यांना कामासाठी आधुनिक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न 'बापू' काटे यांच्या अध्यक्षतेखाली हा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेल्या काही काळात पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाचा वाढलेला व्याप आणि कार्यकर्त्यांचा सहभाग लक्षात घेऊन मोरवाडी येथील मध्यवर्ती कार्यालयाचे आकर्षक व आधुनिक पद्धतीने नूतनीकरण करण्यात आले आहे. या नव्या वास्तूमध्ये प्रशस्त कॉन्फरन्स हॉल, डिजिटल मीडिया कक्ष, पदाधिकाऱ्यांसाठी आधुनिक केबिन, ग्रंथालय तसेच पक्षविस्तार आणि संघटनात्मक कामकाजासाठी आवश्यक अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सुविधांमुळे पक्षाच्या बैठका, संघटनात्मक नियोजन, आगामी कार्यक्रमांची आखणी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणे अधिक सुलभ होणार आहे. त्याचबरोबर सामान्य नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडे पाठपुरावा करण्याचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणूनही हे कार्यालय कार्यरत राहणार आहे.

किल्ल्यांच्या माध्यमातून चिमुकल्यांनी जागविला स्वराज्याचा इतिहास!

पिंपळे सौदागर : दैनिक संध्या

छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम, स्वराज्याचा गौरवशाली इतिहास आणि गड-किल्ल्यांची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'किल्ले बनवा' स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत बालचिमुकल्यांनी साकारलेल्या विविध गड-किल्ल्यांच्या प्रतिकृतींमधून त्यांची कल्पकता, कलात्मकता आणि इतिहासाविषयीची आवड पाहायला मिळाली. या स्पर्धेत युवराज राऊत आणि गोपाल प्रतिष्ठान यांनी प्रथम क्रमांक पटकावला. स्वराज प्रतिष्ठान यांनी द्वितीय, तर आरती पुजारी यांनी तृतीय क्रमांक मिळविला. तसेच श्रीयांश कुंजीर, आदित्य रोडे आणि आम्ही शिवबाचे मावळे यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याशिवाय स्पर्धेत सहभागी झालेल्या जवळपास २५ स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षिसे देऊन त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यात आले. या बक्षीस वितरण समारंभास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे, नगरसेविका अनिता काटे, केशव शंखनाद पथकाच्या प्रणिता अवधूत, सामाजिक कार्यकर्त्या शारदा मुंडे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष अशोक वारकर, आनंद हास्य योगा क्लबचे अध्यक्ष दिगंबर राजगुरे, अनिल कुलकर्णी, रमेश वाणी, राजू शेलार आणि उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरतीने करण्यात आली. त्यानंतर फिरोज मुजावर यांनी आपल्या लालित्यपूर्ण पदन्यासातून गणेश वंदना सादर केली. त्यांच्या बहारदार सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भामिनी महाले आणि सागर बिरारी यांनी केले. डॉ. कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या की, "छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा केवळ वाचण्याचा विषय नसून तो प्रत्येक पिढीने समजून घेण्याचा आणि त्यातून प्रेरणा घेण्याचा विषय आहे. गड-किल्ले हे आपल्या पराक्रमाचे, शौर्याचे आणि स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाचे साक्षीदार आहेत. आजच्या बालकांनी स्वतःच्या कल्पकतेतून किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारत इतिहासाशी जोडले जाणे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. अशा स्पर्धांमुळे मुलांमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण होते.

लोकनेत्याच्या वाढदिनी लोकसेवेचा यज्ञ

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' उपक्रम



■ पिंपरी (दै. संध्या)

वाढदिवस म्हटला की शुभेच्छांचे फलक, मोठमोठे होर्डिंग, हार-तुरे, सत्कार आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन असे चित्र सर्वत्र पाहायला मिळते. मात्र, या पारंपरिक उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त एक सेवाभावी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. 'लोकनेत्याच्या वाढदिनी लोकसेवेचा यज्ञ' या संकल्पनेतून पुणे जिल्ह्यातील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्याचा संकल्प भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवडच्या वतीने केला आहे.

'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमाचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून प्रेरणा घेत दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि आदिवासी पट्ट्यातील गरजू कुटुंबांना जीवनावश्यक साहित्याची मदत उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

आमदार महेश लांडगे यांचा २७ नोव्हेंबर रोजी वाढदिवस आहे. या निमित्ताने कोणत्याही प्रकारची जाहिरातबाजी, शुभेच्छांचे फ्लेक्स, बॅनर किंवा होर्डिंग न लावता त्यासाठी होणारा खर्च गरजूंच्या मदतीसाठी वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वाढदिवसाचा आनंद केवळ कार्यकर्ते आणि समर्थकांपुरता मर्यादित न ठेवता समाजातील वंचित आणि गरजू घटकांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे, अशी माहिती उपक्रमाचे समन्वयक तथा भाजपाचे सरचिटणीस विकास डोळस आणि संजय पटणी यांनी दिली.

या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित घोडके, आमदार उमाताई खापरे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, उपक्रमाचे समन्वयक तथा सरचिटणीस विकास डोळस, सरचिटणीस मधुकर बच्चे, सरचिटणीस संजय पटणी, नगरसेवक निलेश नेवाळे, क प्रभाग अध्यक्ष निखिल बोराडे यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकारी, हितचिंतक आणि परिवारातील सदस्य उपस्थित होते.

"आमदार महेशदादा लांडगे यांनी आपल्या वाढदिवसाला सामाजिक उत्तरदायित्वाची जोड देत पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. 'एक नगरसेवक, एक गाव' ही केवळ घोषणा नसून प्रत्यक्ष कृतीतून लोकसेवा करण्याचा संकल्प आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या औद्योगिक शहरातून आदिवासी आणि दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांसाठी मदतीचा हात पुढे जाणे, ही सामाजिक एकात्मतेची भावना अधिक बळकट करणारी बाब आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाल्याने कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे. शहर भाजपाचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते या सेवाकार्यात सक्रिय सहभाग घेऊन प्रत्येक निवडलेल्या गावातील गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध आहेत. सेवाभाव हीच भारतीय जनता पार्टीच्या कार्याची खरी ओळख आहे, असे शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड, पुणे यांनी सांगितले.



"माझ्या वाढदिवसानिमित्त शहरात मोठमोठे होर्डिंग लागावेत, हार-तुरे आणि सत्कार व्हावेत, यापेक्षा एखाद्या गरजू कुटुंबाच्या घरात महिनाभराची अन्नधान्याची व्यवस्था व्हावी, हे माझ्यासाठी अधिक समाधानाचे आहे. समाजाने दिलेल्या प्रेमाची परतफेड समाजसेवेतूनच झाली पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रेरणेतून आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ आदिवासी गावांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा संकल्प आम्ही केला आहे. राजकारण हे केवळ निवडणुका आणि सत्तेपुरते मर्यादित नसून समाजातील शेवटच्या घटकाच्या अडचणीच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहण्याचे प्रभावी माध्यम आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त मला शुभेच्छा देऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकाने या माणुसकीच्या यज्ञात सहभागी व्हावे, हीच माझी अपेक्षा आहे."

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड पुणे.

'एक नगरसेवक, एक गाव' संकल्पनेतून मदतीचे नियोजन

उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातील खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील ५१ आदिवासीपट्ट्यातील गावांची निवड करण्यात आली आहे. 'एक नगरसेवक, एक गाव' या संकल्पनेनुसार भोसरी विधानसभा मतदारसंघातील नगरसेवक किंवा नगरसेविकेकडे एका गावाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संबंधित गावातील गरजू कुटुंबांची माहिती संकलित करणे, आवश्यक साहित्याचे नियोजन करणे आणि प्रत्यक्ष मदतवाटपाची जबाबदारी संबंधित लोकप्रतिनिधी आणि समन्वयक पार पाडणार आहेत. आमदार महेश लांडगे यांच्या कार्यालयामार्फत प्रत्येक गावासाठी स्वतंत्र समन्वयक उपलब्ध करून देण्यात आला आहे. प्रत्येक गरजू कुटुंबाला किमान एक महिना पुरेल इतके धान्य, किराणा आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. १५ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत संबंधित गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन मदतवाटप पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

वाढदिवसाच्या खर्चातून गरजूंच्या घरात अन्नधान्य!

वाढदिवसानिमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन त्या निधीचा समाजोपयोगी कामासाठी विनियोग करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. शुभेच्छांचे फलक, जाहिराती, सत्कार, सजावट आणि अन्य कार्यक्रमांवरील खर्च टाळून त्याऐवजी गरजू कुटुंबांना मदत करण्याचे आवाहन नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकारी आणि हितचिंतकांना करण्यात आले आहे. या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील वाढदिवस साजरा करण्याच्या प्रचलित पद्धतीला विधायक पर्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून गावागावांत मदत पोहोचविण्याबरोबरच समाजातील दानशूर व्यक्तींनाही सेवाकार्यात सहभागी करून घेण्याचा मानस आहे.

डिसेंबर २०२६ मध्ये मदतीचा दुसरा टप्पा

या उपक्रमाची व्याप्ती केवळ ५१ गावांपुरती मर्यादित राहणार नाही. डिसेंबर २०२६ च्या पहिल्या आठवड्यात सामाजिक संस्था, उद्योजक, व्यापारी, दानशूर व्यक्ती आणि नागरिकांच्या लोकसहभागातून आणखी दुष्काळग्रस्त गावांमध्ये मदतकार्य राबविण्याचे नियोजन आहे. उपक्रमांतर्गत मदत मिळालेल्या गावांची नावे, लाभार्थी कुटुंबांची संख्या, वितरित साहित्याचा तपशील, छायाचित्रे आणि व्हिडिओ यांचा स्वतंत्र अहवाल तयार करून भाजपा प्रदेश कार्यालयाकडे सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे मदतकार्याचे नियोजन, अंमलबजावणी आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ यांची नोंद ठेवली जाणार आहे.

इनोव्हा कारमधून ३ लाखांची रोकड लंपास; केशवनगर येथील घटना

■ चिंचवड(दै. संध्या)



सोसायटीसमोरील फॅब्रिकेशन गोडावूनमध्ये पार्क केलेल्या इनोव्हा कारमधील तीन लाख रुपयांची रोकड संमतीशिवाय घेऊन एक तरुण आपल्या मूळ गावी निघून गेला. ही घटना ५ नोव्हेंबर रात्री साडेनऊ ते ६ नोव्हेंबर सकाळी साडेसहाच्या दरम्यान चिंचवडगावातील केशवनगर येथे घडली.


याप्रकरणी महेंद्र राजपूत (वय २०, रा. बलिराज धुरीखेडा, निहास्था, रायबरेली, उत्तर प्रदेश) याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सचिन संपतराव काकडे (वय ४७, व्यवसाय शेती, रा. फ्लॅट क्रमांक १०४, एच विंग, गोयल गरिमा सोसायटी, केशवनगर, चिंचवडगाव) यांनी शुक्रवारी (दि. १३ नोव्हेंबर) रोजी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपीने गोडावूनमध्ये पार्क केलेल्या इनोव्हा कारमधील (एमएच १४ एलयू ०९५५) तीन लाख रुपयांची रोकड फिर्यादीच्या संमतीशिवाय घेतली आणि उत्तर प्रदेशातील मूळ गावी निघून गेला. तो परत येईल म्हणून फिर्यादीने काही दिवस वाट पाहिली. दरम्यान, दिवाळी सणासाठी फिर्यादी आपल्या मूळ गावी गेले असता त्यांनी आरोपीला फोन केला; मात्र आरोपीने फोन उचलणे बंद केल्याने चोरीची खात्री पटली.

गृहनिर्माण सोसायट्यांमधील 'लिफ्ट'च्या सुरक्षिततेसाठी राज्यात नवे नियम लागू

■ पिंपरी(दै. संध्या)

महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय हा गृहनिर्माण संस्थांसाठी म्हणजेच हाउसिंग सोसायट्यांसाठी घेतला आहे. २०१७ मध्ये महाराष्ट्र एस्केलेटर, लिफ्ट तसेच मूव्हिंग वॉक यांच्यावर अधिनियम लागू करण्यात आले. त्यानंतर तब्बल नऊ वर्षांनी गृहनिर्माण सोसायट्यांसाठी राज्य सरकारने नवीन लिफ्ट सुरक्षा नियम अधिसूचित केला आहे. हे नवे नियम १ नोव्हेंबरपासून महाराष्ट्रात लागू करण्यात आले. २०२६ पासून जे मान्यताप्राप्त कंत्राटदारांना लिफ्टची सर सर्व्हिसिंग करणे, प्रत्येक नव्या वर्षी लिफ्टची तपासणी करणे आणि थर्ड पार्टी विमा काढणे बंधनकारक आहे.ज्या सोसायट्यांमध्ये आधीपासूनच लिफ्टची सुविधा आहे.

२८ ऑक्टोबर २०२७ अंतिम तारीख




त्यांना या नव्या नियमांनूसार सोयी देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामध्ये या लिफ्टना सीसीटीव्ही कॅमेरे, स्वयंचलित बचाव उपकरणे ओव्हरलोड प्रोटेक्शन डिव्हाइस म्हणजेच अतिभार संरक्षण उपकरणे बसवून देण्यात येणार आहे. हे काम पूर्ण करण्याची तारीख ही २८ ऑक्टोबर २०२७ अशी देण्यात आली.

घालून दिलेल्या नवीन नियमांचे कंत्राटदार योग्य प्रकारे पालन करत आहेत की नाही यासाठी गृहनिर्माण सोसायट्यांमधील व्यवस्थापन समित्यांना कंत्राटदारांकडून मासिक देखभाल तसेच तपासणीच्या नोंदी ठेवणे आणि वार्षिक सुरक्षा ऑडिट आयोजित करणे बंधनकारक आहे. लिफ्ट अपघाताच्या अनेक घटना या घडत असतात. अनेक लिफ्ट अपघातानंतर हे नवे नियम अधिसूचित करण्यासाठी नागरिक आणि कार्यकर्ते राज्य सरकारकडे पाठपुरावा करत होते. ज्येष्ठ नागरिक आणि मुलांची सुरक्षा महत्त्वाच्या स्थानी ठेवून हा निर्णय घेण्यात आला आहे. कायदा मंजूर झाल्यानंतर नऊ वर्षांनी हे नियम लागू करण्यात येणार आहे.यामध्ये देखील दोन नियम करण्यात आले आहेत.

निःस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या लेकरांना पुरस्कार समर्पित

मराठी पत्रकार संघाच्या जीवनगौरव पुरस्काराने अम्मांचा सन्मान; मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

■ पिंपरी(दै. संध्या)



"मराठी पत्रकार संघाने दिलेला हा पुरस्कार म्हणजे माझ्या लेकरांनी दिलेला पुरस्कार आहे. माझी लेकरं हाच माझा सर्वात मोठा पुरस्कार असून, जगाला निःस्वार्थ भावनेने सेवा देणाऱ्या या लेकरांना मी हा पुरस्कार समर्पित करते," अशा भावपूर्ण शब्दांत आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या आध्यात्मिक गुरू तथा विश्वमाता माता अमृतानंदमयी (अम्मा) यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मराठी पत्रकार संघाच्या वतीने निगडी येथे शनिवारी (दि. १४ नोव्हेंबर) आयोजित सोहळ्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते अम्मांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला आमदार महेश लांडगे, दैनिक सकाळच्या संपादक शीतल पवार, डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या भाग्यश्री पाटील, कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, व्हीजे डेव्हलपर्सच्या अस्मिता जावडेकर, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, प्रदेश उपाध्यक्ष विवेक इनामदार आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे या सोहळ्याला शुभेच्छा दिल्या.

अम्मा म्हणाल्या, महाराष्ट्र ही संत-महात्म्यांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी त्याग व देशभक्तीचा आदर्श घालून दिला आहे. महाराष्ट्रातील महापुरुषांचे योगदान अत्यंत प्रेरणादायी आहे. समाजात धर्मभावना आणि नैतिक मूल्ये टिकवून ठेवण्यात पत्रकारांची भूमिका महत्त्वाची आहे. पत्रकारांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, यासाठी मी प्रार्थना करते. अत्यंत विनम्र भावनेने हा पुरस्कार स्वीकारत असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, महिलांना स्वावलंबी बनविण्याबरोबरच विकसित राष्ट्र घडविण्याच्या कार्यात अम्मांचे योगदान मोठे आहे. मायेचा अथांग सागर असलेल्या माता अमृतानंदमयी यांचा हा सत्कार म्हणजे कृतज्ञता सोहळा आहे. विश्वकल्याणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या अम्मांना मी वंदन करतो.अम्मांच्या मायेचा स्पर्श कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचला आहे. दुःखात असलेल्या लोकांना अध्यात्माने आधार दिला पाहिजे, या विचारातून अम्मांनी अध्यात्माला समाजसेवेचे स्वरूप दिले आणि करुणेला चळवळीचे रूप दिले. सामाजिक कृतज्ञतेच्या भावनेतून त्या कार्य करतात. नैसर्गिक आपत्तीच्या काळातही त्यांनी मोठा मदतीचा हात पुढे केला आहे. त्यांच्या या महान कार्याला मी वंदन करतो. पुणे ही संतांची भूमी असून या संतभूमीत अम्मांचे स्वागत करताना आनंद होत असल्याचे मोहोळ यांनी नमूद केले.

थोडक्यात पण महत्वाचे



संत साहित्य व्यापक स्वरूपात शालेय अभ्यासक्रमात यावे

नारायणगाव : दैनिक संध्या

समाजाला दिशा देण्याचे काम संत साहित्य करते. लहान वयात झालेले संस्कार दीर्घकाळ टिकतात. डॉक्टर रतिलाल बाबेल यांचे "सुवचने तुकोबांची" हे संस्कारक्षम पुस्तक वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी उपयुक्त असल्याचे मत मधुर व्याख्यात्या प. पू. अनुप्रेक्षाजी मा. सा. यांनी जेऊर, ता. करमाळा या ठिकाणी मांडले. डॉ. रतिलाल बाबेल यांच्या " सुवचने तुकोबांची " या पुस्तकाचे प्रकाशन अतिशय साध्या पद्धतीने प. पू. अनुप्रेक्षाजी मा. सा. यांच्या हस्ते व प. पू. श्रुतीप्रभाजी मा. सा, प. पू. ऋजुप्रभाजी मा. सा. यांच्या उपस्थितीत झाले. संत तुकाराम गाथेंचा लौकिक जीवनाशी जवळचा संबंध आहे. प्रत्येकाचे जीवन सुखी समाधानी करण्याची ताकद प्रत्येक अभंगांमध्ये आहे. संत साहित्याचा समावेश सध्याच्या अभ्यासक्रमात त्रोटक स्वरूपामध्ये आहे. तो व्यापक स्वरूपामध्ये यायला पाहिजे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक व्यक्ती सुखी होण्यासाठी संत साहित्याचे वाचन होणे गरजेचे आहे. संत तुकारामांच्या गाथेतील निवडक अभंगातील विचार तसेच गाथेतील वैज्ञानिक संकल्पना यांना उजाळा देण्याचा प्रयत्न लेखक डॉ. रतिलाल बाबेल यांनी " सुवचने तुकोबांची" या पुस्तकातून केला आहे. तरुणांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी डॉ. रतिलाल बाबेल यांचे पुस्तक अत्यंत उपयोगी आहे असे मत परमपूज्य अनुप्रेक्षाजी मा.सा. यांनी यावेळी व्यक्त केले. लेखक रतिलाल बाबेल म्हणाले की, जीवनात येणाऱ्या प्रत्येक अडचणीत, संघर्षात तुकाराम महाराजांचे अभंग मार्गदर्शन करणारे आहेत. हे अभंग आत्मविश्वास वाढविणारे, जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघायला शिकवणारे व चंचल मनाला मार्गदर्शन करणारे आहेत. या पुस्तकातून प्रेरणा घेऊन संत तुकाराम गाथेचा तरुणांनी वेगळ्या पद्धतीने अभ्यास करावा व स्वतःबरोबर इतरांच्या ही जीवनात आनंद पेरावा, या उद्देशाने या पुस्तकाची निर्मिती केली आहे. साडेतीनशे वर्षे होऊन गेली तरी संत तुकाराम महाराजांचे अभंग आजही नित्य नूतन, ताजेतवाने व टवटवीत वाटतात. त्यांच्या अभंगात कष्टमय जगण्याचा गौरव आहे.

चार गावांना सचिन अहिर युथ फाउंडेशन यांच्या वतीने दिवाळीकिटचे वाटप

दौंड : दैनिक संध्या

दुष्काळी भागातील खोर, देऊळगाव गाडा, पदवी आणि कुसेगाव येथे गरीब आणि गरजू कुटुंबाना एकूण दिवाळी साहित्याचे एकूण 210 किट वाटप करण्यात असल्याची माहिती सचिन अहिर युथ फाउंडेशचे अध्यक्ष समीर पोपटराव भोईटे यांनी दिली आहे. या वाटप करण्यात आलेल्या दिवाळी किट मध्ये एक किलो रवा, एक किलो मैदा, एक किलो साखर, अर्धा किलो खोबरे, एक किलो गहू पीठ, खस खस, मोती साबण, आणि युटणे याचा समावेश आहे. " गरिबांना मदतीचे तोरण, हे शिवसेनेचे धोरण या युक्ती नुसार राज्याचे उप मुख्यमंत्री आदरणीय एकनाथ शिंदे यांच्या धोरणनुसार विधान परिषद युप सभापती सचिन अहिर युथ फाउंडेशन च्या वतीने दरवर्षी हा उपक्रम दरवर्षी पदवी या गावात घेण्यात येतो. मात्र यावर्षी खोर देउळगाव गाडा आणि कुसेगाव हि तीन गावे वाढवण्यात आली आहेत. पदवी येथे किट वाटप प्रसंगी अनिल शितोळे, भाऊ शितोळे,, सूरज शितोळे, ओंकार शितोळे, हरिचंद्र शितोळे, ऋषिकेश शितोळे, आणि सुहास धुमाळ शुभम बारवकर, आकाश बारवकर हे उपस्थित होते, देउळगाव गाडा येथे अमोल पवार, कुसेगाव येथे सौरभ शितोळे, खोरं येथे दादा चौधरी, सागर चौधरी, आणि जालिंदर डोंबे हे उपस्थित होते.

शिरूरमध्ये ३४ वर्षीय तरुणाचा संशयास्पद अवस्थेत मृत्यू; आकस्मिक मृत्यूची नोंद

शिरूर : दैनिक संध्या

शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील निमोणे येथे ३४ वर्षीय तरुणाचा मृतदेह घराच्या पाठीमागे शौचालयाच्या टाकीजवळ आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. राजा गोबरी चव्हाण (वय ३४, रा. निमोणे, ता. शिरूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याबाबत संतोष रामतपस्या चव्हाण (वय ३८, रा. निमोणे) यांनी पोलिसांना खबर दिली आहे. संतोष चव्हाण हे मागील चार वर्षांपासून निमोणे येथे सेंट्रिंगचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचा चुलत भाऊ राजा चव्हाण हा मागील तीन वर्षांपासून त्यांच्या शेजारील खोलीत राहत होता. दोघेही एकत्र काम करीत होते. दरम्यान, राजा चव्हाण याला मागील एक वर्षापासून क्षयरोगाचा (टी.बी.) त्रास होता. त्याच्यावर औंध येथे उपचार सुरू होते. शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास संतोष चव्हाण हे कामावर जाण्यासाठी निघाले असता त्यांना राजा हा घराच्या पाठीमागे शौचालयाच्या टाकीजवळ बेशुद्ध अवस्थेत पडलेला दिसला. त्यांनी त्याला उठविण्याचा प्रयत्न केला; मात्र त्याच्याकडून कोणतीही हालचाल जाणवली नाही. त्यानंतर त्याला खासगी वाहनाने दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ग्रामीण रुग्णालय, शिरूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या घटनेची शिरूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू रजिस्टर क्रमांक १८९/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. पोलीस हवालदार टेंगले (ब.नं. २४९९) हे पुढील तपास करीत आहेत. तरुणाच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे निमोणे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कृषी विभागाचे रब्बी हंगाम व एफएफएस खत बुकिंग ॲपविषयी मार्गदर्शन शिबिर

दौंड : दैनिक संध्या

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना रब्बी हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाने व मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मोहिमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर दौंड तालुक्यातील खामगाव येथे नुकतेच शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिर पार पडले. या कार्यक्रमात शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा आणि शेतकऱ्यांना सुलभतेने खते उपलब्ध व्हावीत, यासाठी एफएफएस (FFS) खत बुकिंग ॲप बाबत उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. या ॲपच्या माध्यमातून शेतकरी घरबसल्या किंवा आपल्या मोबाईलवरून खतांचे नियोजन व बुकिंग कसे करू शकतात, याविषयी मोलाचे मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच, रब्बी हंगामातील पिकांचे व्यवस्थापन करताना बीज प्रक्रिया, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणे आणि पिकांची जोपासना कशी करावी, याविषयी सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग्य बीज प्रक्रियेमुळे पिकांचे रोगांपासून संरक्षण होते आणि उत्पादनात वाढ होते, असे त्यांनी स्पष्ट केले.



पंचवीस वर्षांनंतर पुन्हा फुलला मैत्रीचा गंध 'मैत्र स्मरण २०२६' स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा

■ बारामती (दै. संध्या)

भिकोबानगर येथील श्री विठ्ठल माध्यमिक विद्यालयाच्या १९९९-२००० या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा 'मैत्र स्मरण २०२६' हा भव्य स्नेहमेळावा तब्बल पंचवीस वर्षांनंतर मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात पार पडला. प्रदीर्घ कालावधीनंतर गुरुजन,वर्गमित्र आणि मैत्रिणी एकत्र आल्याने शाळेचा परिसर जुन्या आठवणींनी आणि स्नेहभावनेने भारावून गेला. विद्यादेवता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी तत्कालीन प्राचार्य प्रवीण जगताप सर,तसेच सोमनाथ जाधव सर, दिलीप त्रिवेदी सर, दत्तात्रय भोसले सर आणि दत्तात्रय इंगळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षकांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. या स्नेहमेळाव्यास ५५ माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

२१ विद्यार्थिनी आणि ३४ विद्यार्थ्यांचा समावेश होता.या बॅचमधील माजी विद्यार्थी आज सरकारी सेवा,वैद्यकीय क्षेत्र,शेती,व्यवसाय तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आहेत.अनेक विद्यार्थिनी शिक्षिका म्हणून ज्ञानदानाचे कार्य करत असून काही जणी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत आहेत. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील गंमती- जमती,अविस्मरणीय प्रसंग आणि जुन्या आठवणी सांगत वातावरण भावनिक व आनंदी केले.त्यानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घेत मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले. एका माजी विद्यार्थिनीच्या मुलीने सादर केलेल्या लाठी-काठी प्रात्यक्षिकाने उपस्थितांची मने जिंकली.तसेच एका माजी विद्यार्थ्यांच्या मुलीने स्केच पेंटिंग कलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले. 'संगीत खुर्ची'च्या खेळाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. सूत्रसंचालन अमित कोकरे व श्रीपाद जगताप यांनी केले.किरण कडाळे व मनोज पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. 'मैत्र स्मरण २०२६' हा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी श्रीपाद जगताप,अमित कोकरे,प्रियंका सायकर,मोनिका जगताप,वृषाली कोकरे,संदीप मोटे,लक्ष्मण कोकरे, किरण कडाळे,सुरज धुमाळ आणि मनोज पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.पंचवीस वर्षांनंतरची ही भेट केवळ स्नेहमेळावा न राहता जुन्या मैत्रीला नव्याने उजाळा देणारा आणि आठवणींची शिदोरी देणारा सोहळा ठरला.

पाटसमध्ये अवैध धंद्यांचा सुळसुळाट

पाटस यात्रेच्या पार्श्वभूमीवर अवैध धंदे बंद करण्याची मागणी; पोलीस प्रशासनाच्या कारभारावर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह

■ पाटस (दै. संध्या)



दौंड तालुक्यातील पाटस येथे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असल्याचे सांगितले जाणारे जुगारी अड्डे, मटका तसेच इतर अवैध धंदे तातडीने बंद करण्याची मागणी ग्रामस्थांमधून जोर धरू लागली आहे. येत्या आठ दिवसांत पाटसची यात्रा सुरू होणार असून, यात्रेच्या पार्श्वभूमीवर गावातील सर्व अवैध धंद्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

पाटस हे परिसरातील महत्त्वाचे गाव असून यात्रेनिमित्त येथे मोठ्या संख्येने भाविक, व्यापारी आणि नागरिकांची गर्दी होत असते. अशा वेळी गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, गाव परिसरात जुगार, मटका आणि इतर अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून केल्या जात आहेत.

अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी चुकीच्या मार्गाला लागण्याची भीती व्यक्त केली जात असून, गावातील सामाजिक वातावरणावरही त्याचा परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. वारंवार तक्रारी होऊनही या धंद्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.पाटस यात्रेच्या निमित्ताने पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवून जुगारी अड्डे, मटका आणि इतर अवैध धंद्यांवर तातडीने छापे टाकावेत. तसेच संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करून हे धंदे कायमस्वरूपी बंद करावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



विमल कांडगे यांचे निधन

■ चाकण (दै. संध्या)

चाकण येथील जुन्या पिढीतील महिला कार्यकर्त्या विमल दत्तात्रय कांडगे (वय - ६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. येथील कर्तव्यदक्ष नगरसेवक मंगेशभाऊ कांडगे यांच्या त्या चुलती होत.

पैसा, प्रतिष्ठेचा अहंकार आणि कायद्याची भीती संपत चालली आहे का?

■ बोरी (दै. संध्या)

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत माणसाकडे पैसा वाढत आहे; मात्र माणुसकी, संयम, सहनशीलता आणि एकमेकांबद्दलचा आदर कमी होत चालल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. पैशाचा वाढता अहंकार, प्रतिष्ठेची खोटी मिजास, राजकीय किंवा सामाजिक पाठबळाचा गैरसमज आणि कायद्याचा धाक राहिलेला नाही, अशा मानसिकतेमुळे समाजातील वातावरण चिंताजनक बनत आहे.

पूर्वी एखाद्या किरकोळ कारणावरून वाद झाला, तरी गावातील ज्येष्ठ मंडळी मध्यस्थी करून तो मिटवत असत. दोन शब्द समजुतीचे सांगितले की वाद संपायचा. मात्र आज परिस्थिती बदलत आहे. साध्या बोलण्यावरून गैरसमज, गैरसमजातून वाद, वादातून शिवीगाळ, शिवीगाळीतून हाणामारी आणि काही वेळा थेट जीव घेण्यापर्यंत मजल जात आहे. एखाद्याने आपल्याला उलट उत्तर दिले, आपला अपमान केला किंवा आपल्या म्हणण्याप्रमाणे वागले नाही, तर त्याला धडा शिकवण्याची मानसिकता वाढत आहे. ही समाजासाठी अत्यंत घातक बाब आहे. आज काही लोकांकडे पैसा, गाडी, बंगला आणि सामाजिक प्रतिष्ठा आली की आपण कोणालाही काहीही बोलू शकतो, कोणाशीही वाद घालू शकतो, आपल्याला कोणी काही करू शकत नाही, अशी भावना निर्माण होते.

मल्हार नगरीत छठ महापर्वाचा उत्साह

शेकडो उत्तर भारतीय भाविकांचे सूर्यदेवतेला अर्घ्यदान!

■ पुरंदर (दै. संध्या)



महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबारायांच्या मल्हार नगरीत उत्तर भारतीय बांधवांचे श्रद्धास्थान असलेला छठ महापर्व सोमवारी पहाटे मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. जेजुरी येथील ऐतिहासिक होळकर-पेशवे तलाव तसेच कऱ्हा नदीच्या काठावर छठ पूजेनिमित्त शेकडो भाविकांनी गर्दी केली होती.

उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेश या राज्यांतून नोकरी, व्यवसाय आणि उद्योगाच्या निमित्ताने जेजुरी व पंचक्रोशीत स्थायिक झालेल्या परप्रांतीय बांधवांनी या धार्मिक सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पहाटे सूर्योदयाच्या वेळी महिला व पुरुष भाविकांनी नदीच्या आणि तलावाच्या पाण्यात उभे राहून सूर्यदेवतेचे, अर्थात सूर्यरूपी मार्तंड देवतेचे पूजन केले. पारंपरिक विधी आणि श्रद्धापूर्वक सूर्यदेवतेला अर्घ्य अर्पण करून कुटुंबाच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली.या कार्यक्रमात जेजुरी यथील छठ भविक अजित सिह मुकेश मिश्रा, हिरालाल यादव, संजय सिहं उषा यादव, त्रिपाठी शर्मा, दुबे ठाकूर पांडे इत्यादी उपस्तित होतें

जेजुरीच्या खंडोबारायांना नेवासा येथील म्हाळसादेवीचा बेलभंडारा अर्पण

माहेरच्या देवस्थानाकडून परंपरेनुसार धार्मिक विधी; कडेपठार व मुख्य गडावर तळीभंडार सोहळा उत्साहात

■ जेजुरी(दै. संध्या)



लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरी येथील श्री खंडोबारायांना त्यांची सासुरवाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेवासा येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थानच्या वतीने म्हाळसादेवीचा बेलभंडारा अर्पण करण्यात आला. माहेरच्या देवस्थानाकडून जेजुरी गडावर बेलभंडारा अर्पण करण्याची ही धार्मिक परंपरा भक्तिभावाने पार पडली.

नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई देवस्थानच्या जीर्णोद्धार कमिटीच्या वतीने संभाजी ठाणगे, राजेंद्र काशीद तसेच देवस्थानचे प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या पुढाकाराने नेवासा येथून बेलभंडारा जेजुरी येथे नेण्यात आला. सर्वप्रथम जेजुरी येथील कडेपठारावर जाऊन तेथील श्री खंडोबारायांना बेलभंडारा अर्पण करण्यात आला. यावेळी विधिवत तळीभंडार करण्यात आल्यानंतर म्हाळसादेवीचा बेलभंडारा खंडोबारायांच्या चरणी वाहण्यात आला.त्यानंतर नव्या मुख्य गडावर जाऊन तेथेही श्री खंडोबारायांना बेलभंडारा अर्पण करून पारंपरिक पद्धतीने तळीभंडार सोहळा पार पडला. यावेळी मुख्य पुजारी निलेश बारभाई यांनी म्हाळसादेवीचे माहेर असलेल्या नेवासाहून आलेले संभाजी ठाणगे व राजेंद्र काशीद यांचा श्रीफळ व प्रसाद देऊन सन्मान केला. जेजुरी गडावरील मुख्य देवदेवतांनाही नेवासा येथील म्हाळसादेवीचा बेलभंडारा अर्पण करण्यात आला. यावेळी भाविकांनी भक्तिभावाने खोबऱ्याची उधळण करीत *'येळकोट येळकोट जय मल्हार'*च्या जयघोषात धार्मिक सोहळा साजरा केला. नेवासा हे म्हाळसादेवीचे माहेर आणि जेजुरी हे खंडोबारायांचे मुख्य श्रद्धास्थान असल्याने या दोन्ही तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या या धार्मिक उपक्रमातून श्रद्धा, परंपरा आणि भक्तिभावाचे अनोखे दर्शन घडले.

थोडक्यात पण महत्वाचे



सौ. नेहा किशोरकुमार शहा (सराफ) यांना 'भारत सेवा पुरस्कार' प्रदान

बारामती : दैनिक संध्या

सामाजिक,धार्मिक व सेवाभावी कार्यातील योगदानाची दखल घेत बारामती येथील सौ.नेहा किशोरकुमार शहा (सराफ) यांना मानाचा 'भारत सेवा पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. प्रथमाचार्य श्री १०८ शांतिसागरजी महाराज यांच्या १०० व्या आचार्य पदारोहण सोहळ्यानिमित्त शनिवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी समडोळी येथील श्री १००८ शांतिनाथ जैन मंदिरात भव्य सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.. या कार्यक्रमासाठी प्रेरणा परम पूज्य १०८ मुनिश्री हितेंद्र सागरजी महाराज यांची असून,सान्निध्य परम पूज्य मुनिश्री क्षेम सागरजी महाराज संघाचे लाभले. सौ.नेहा किशोरकुमार शहा या बारामती येथील रहिवासी असून, त्या व्यवसाया सोबतच सामाजिक व धार्मिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याने बारामतीकरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. या सन्मान सोहळ्याचे आयोजन श्री 1008 शांतिनाथ दिगंबर जैन मंदिर समडोळी यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे संयोजक डॉ.सुधीरकुमार शास्त्री यांनी केले.

कोलंबस'चा टीझर सोशल मीडियावर लाँच!!

पुणे : दैनिक संध्या

शिक्षक होण्याचं स्वप्न पाहून उच्च शिक्षित झालेल्या, पण नोकरी मिळत नाही म्हणून एका वेगळ्याच इंडस्ट्रीमध्ये जाऊन आपले नशीब घडवण्याचा विचार करणाऱ्या तरुणाची गोष्ट आपल्याला कोलंबस या चित्रपटातून आपल्याला पहायला मिळणार आहे. अत्यंत वेगळ्या धाटणीच्या या कथानकतून प्रेक्षकांच पुरेपूर मनोरंजन होणार असून, ११ डिसेंबरला "कोलंबस" संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. एस एस आर फिल्म्स प्रस्तुत 'कोलंबस' या चित्रपटाची निर्मिती सतीश नाईक, रोहित गुप्ता, सनोबर लाकडावाला यांनी केली आहे. रवींद्र शिवाजी यांनी दिग्दर्शन, गौरव कुलकर्णी यांनी छायालेखन, रोहन पाटील, सुयश जाधव यांनी संकलन, वैभव शिरोळे यांनी संगीत दिग्दर्शन केले आहे. चैतन्य पिसाळ यांनी लेखन आणि क्रिएटिव्ह दिग्दर्शन केलं आहे. रोहित नागभिडे यांनी पार्श्वसंगीत केलं आहे, तर आनंद शिंदे, कैलास वाघमारे यांनी चित्रपटातील गाणी गायली आहेत. चित्रपटात अंकुर वाढवे, रोहित माने, सातारचा बच्चन म्हणून प्रसिद्ध असलेले किरण माने त्याचबरोबर सिमरन खेडकर, अश्विनी भांडे, प्रसाद माने, हेमंत शिंदे, चंद्रकांत मोकल, संस्कार हिरे यांचा दमदार अभिनय आपल्याला या चित्रपटात पहायला मिळणार आहे.



गौरव दिन साजरा करता, मग आदिवासी क्रांतिकारकांच्या नामकरणाचा विसर कसा?

राज्यातील ७६ शासकीय तांत्रिक विद्यालयांच्या नामकरणावर ट्रायबल फोरमचा सवाल

■ कोकण विभाग
(प्रतिनिधी) (दै. संध्या)

भगवान बिरसा मुंडा यांचा गौरव दिन साजरा करणारे शासन आदिवासी क्रांतिकारकांच्या ऐतिहासिक योगदानाला शैक्षणिक संस्थांच्या नामकरणातून सन्मान देण्यास मात्र विसरले आहे काय? राज्यातील ७६ शासकीय तांत्रिक विद्यालयांच्या नामकरण प्रक्रियेत आदिवासीबहुल आणि अनुसूचित क्षेत्रातील विद्यालयांना आदिवासी स्वातंत्र्यवीरांची नावे देण्याचा विचार का करण्यात आला नाही, असा थेट सवाल ट्रायबल फोरमने उपस्थित केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने २१ ऑक्टोबर २०२६ रोजी २५, तर ६ नोव्हेंबर २०२६ रोजी आणखी ५१ अशा एकूण ७६ शासकीय तांत्रिक विद्यालयांच्या नामकरणासंदर्भात निर्णय घेतले आहेत. मात्र, या नामकरण प्रक्रियेत आदिवासी समाजाच्या ऐतिहासिक संघर्षाला, स्वातंत्र्यलढ्यातील बलिदानाला आणि महान क्रांतिकारकांच्या योगदानाला कितपत स्थान मिळाले, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

ब्रिटिश सत्तेविरुद्ध उलगुलानचा ऐतिहासिक लढा उभारणारे भगवान बिरसा मुंडा, ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र संघर्ष करणारे क्रांतिकारक बाबुराव शेडमाके, अन्यायाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारणारे राघोजी भांगरे, शौर्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक असलेल्या राजमाता राणी वीरांगना दुर्गावती, ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारे तंट्या भिल्ल, भीमा नायक आणि खाज्या नाईक यांसारख्या महान आदिवासी क्रांतिकारकांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि आदिवासी अस्मितेच्या संघर्षात ऐतिहासिक योगदान दिले आहे.

१५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'भगवान बिरसा मुंडा गौरव दिन' साजरा केला जातो. या निमित्ताने शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि आदिवासी विकासाच्या संकल्पनांचा प्रचार-प्रसार केला जातो. मात्र, दुसरीकडे राज्यातील ७६ शासकीय तांत्रिक विद्यालयांच्या नामकरणाच्या निर्णयात किमान आदिवासीबहुल आणि अनुसूचित क्षेत्रातील विद्यालयांना भगवान बिरसा मुंडा, क्रांतिकारक बाबुराव शेडमाके, राघोजी भांगरे, राजमाता राणी वीरांगना दुर्गावती, तंट्या भिल्ल, भीमा नायक आणि खाज्या नाईक यांची नावे देण्यास प्राधान्य का मिळाले नाही? गौरव दिन साजरा करणाऱ्या शासनाला आदिवासी क्रांतिकारकांच्या नावाने शैक्षणिक संस्थांचे नामकरण करण्याचा विसर कसा पडला, असा सवाल ट्रायबल फोरमने केला आहे.आदिवासीबहुल जिल्ह्यांतील राखीव मतदारसंघांमध्ये तसेच अनुसूचित क्षेत्रातील तालुक्यांमध्ये असलेल्या शासकीय तांत्रिक विद्यालयांना या महान आदिवासी क्रांतिकारकांची नावे देणे ही त्यांच्या कार्याला कृतीतून दिलेली खरी आदरांजली ठरली असती. केवळ जयंती, गौरव दिन आणि भाषणांमधून आदर व्यक्त करण्यापेक्षा शैक्षणिक संस्थांच्या नामकरणातून त्यांच्या विचारांचा, संघर्षाचा आणि बलिदानाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे अधिक महत्त्वाचे नाही का? आदिवासी समाजाच्या ऐतिहासिक योगदानाला या नामकरण प्रक्रियेत योग्य प्रतिनिधित्व मिळाले का, असा सवाल ट्रायबल फोरम कोकण विभागाचे कार्याध्यक्ष सुनील झळके यांनी उपस्थित केला आहे.

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २४४(१) अंतर्गत पाचव्या अनुसूचीद्वारे अनुसूचित क्षेत्रांच्या प्रशासनासाठी आणि तेथील अनुसूचित जमातींच्या हितसंरक्षणासाठी विशेष घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत. अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींची संस्कृती, परंपरा, ऐतिहासिक ओळख आणि सामाजिक अस्मिता जपण्याला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे अशा क्षेत्रांमधील शासकीय शैक्षणिक संस्थांच्या नामकरणात आदिवासी समाजाचा इतिहास, स्वातंत्र्यवीरांचे योगदान आणि समाजाच्या भावनांचा विचार शासनाने करणे अपेक्षित होते. या नामकरणाचा निर्णय घेणारे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा आणि आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी आदिवासीबहुल क्षेत्रातील शासकीय तांत्रिक विद्यालयांना आदिवासी क्रांतिकारकांची नावे का देण्यात आली नाहीत, याबाबत शासनाची अधिकृत भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी ट्रायबल फोरम कोकण विभागाचे कार्याध्यक्ष सुनील झळके यांनी केली आहे.

सन्मानाच्या विरोधात नाही.

"आम्ही कोणत्याही महापुरुषाच्या किंवा व्यक्तीच्या सन्मानाच्या विरोधात नाही. आमची मागणी केवळ एवढीच आहे की, आदिवासीबहुल अनुसूचित क्षेत्रात असणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या नामकरणात भगवान बिरसा मुंडा, बाबुराव शेडमाके, राघोजी भांगरे, राजमाता राणी वीरांगना दुर्गावती, तंट्या भिल्ल, भीमा नायक आणि खाज्या नाईक यांसारख्या महान आदिवासी क्रांतिकारकांच्या ऐतिहासिक योगदानाला योग्य सन्मान मिळावा. केवळ गौरव दिन साजरा करून चालणार नाही, तर त्यांच्या नावाने शैक्षणिक संस्थांची ओळख निर्माण करून त्यांचा संघर्ष आणि विचार पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे."

- सुनील झळके
कार्याध्यक्ष, ट्रायबल फोरम, कोकण विभाग

सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी केंद्राचे महत्त्वपूर्ण पाऊल

■ पुणे(दै. संध्या)

तळेगाव दाभाडे येथे NHEC संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी भूमिपूजन, केंद्रीय सहकारी संस्था निबंधकांच्या प्रादेशिक कार्यालयाचे उद्घाटन आणि सहकारी तत्त्वावर आधारित 'भारत टॅक्सी' सेवेचा शुभारंभ केंद्रीय गृह व सहकार मंत्री माननीय श्री. अमितभाई शाह यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार,उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे आणि केंद्रीय सहकार राज्यमंत्री श्री. कृष्णपालजी गुर्जर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुनेत्रावहिनी पवार म्हणाल्या की,पुण्यात केंद्रीय सहकारी संस्था निबंधकांचे प्रादेशिक कार्यालय सुरू झाल्यामुळे महाराष्ट्रासह पश्चिम भारतातील सहकारी संस्थांना स्थानिक पातळीवर आवश्यक सुविधा आणि मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे.या कार्यालयाच्या उभारणीसाठी आदरणीय अजितदादांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.त्यांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकार होताना पाहणे ही आनंदाची आणि समाधानाची बाब आहे.

१९७४ मध्ये स्थापन झालेल्या NHEC संस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी केंद्रीय मंत्री अमितभाईंनी १,५०० कोटी रुपयांची मदत उपलब्ध करून दिली,ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.या संस्थेच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.तसेच कामगारांचे प्रलंबित प्रश्नही लवकरच मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आदरणीय अजितदादांनी सहकार क्षेत्राच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करताना त्या म्हणाल्या की,सहकारी साखर कारखान्यांचा सुमारे ९,५०० कोटी रुपयांचा प्राप्तिकराचा प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचे मोठे योगदान होते.तसेच मोलॅसिसवरील कर २८ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याच्या निर्णयामुळे साखर उद्योगाला आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. सहकार क्षेत्राच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी अजितदादांनी सातत्याने प्रयत्न केले. 'भारत टॅक्सी' या सहकारी तत्त्वावरील उपक्रमाबाबत बोलताना सुनेत्रावहिनी म्हणाल्या की, हा उपक्रम केवळ रोजगार उपलब्ध करून देणारा नसून चालकांना मालकी,निर्णय प्रक्रियेतील सहभाग आणि नफ्यात वाटा देणारा आहे.पुण्यातील जवळपास ३५ हजार सारथींना या उपक्रमाचा लाभ होणार आहे.



महिला चालकांसाठी 'सारथी दीदी' ही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून,पात्र चालकांना आयुष्मान भारत योजनेंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य संरक्षण मिळणार आहे.यामुळे चालकांचे आर्थिक सक्षमीकरण होण्याबरोबरच प्रवाशांना परवडणारी आणि सुलभ वाहतूक सेवा उपलब्ध होईल.

सहकार क्षेत्र अधिक सक्षम करणे, संस्थांना आधुनिक सुविधांनी जोडणे आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक प्रगतीला चालना देणे या दृष्टीने हे तिन्ही उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.आदरणीय अजितदादांनी सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकार होताना पाहून मनापासून आनंद होत आहे, असेही सुनेत्रावहिनी म्हणाल्या.

चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते DPGU मध्ये अभिजात मराठी भाषा अध्ययन केंद्रासह दोन नव्या विभागांचे उद्घाटन

■ पुणे(दै. संध्या)

डॉ. डी. वाय. पाटील समूहाच्या ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या (DPGU) स्कूल ऑफ लिबरल आर्ट्समध्ये अभिजात मराठी भाषा अध्ययन केंद्र तसेच मीडिया अँड कम्युनिकेशन आणि तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र , अर्थशास्त्र (PPE) या दोन नव्या विभागांचे उद्घाटन महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना भाषा, संस्कृती, माध्यमे आणि चिकित्सक विचार या क्षेत्रांमध्ये व्यापक शैक्षणिक संधी उपलब्ध होणार आहेत.

यावेळी चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठाच्या परिसराला भेट देऊन नव्याने उभारण्यात आलेल्या सुविधा आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांची पाहणी केली. मीडिया अँड कम्युनिकेशन विभागातील व्यावसायिक दर्जाचे कॅमेरे, ऑडिओ सिस्टीम आणि मॉनिटरिंग उपकरणांनी सुसज्ज स्टुडिओमध्ये विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षणही त्यांनी पाहिले. विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक प्रकल्प सादर करत त्यांच्या अभ्यासक्रमातील प्रत्यक्ष अनुभवांची माहिती दिली. यावेळी मंत्र्यांनी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधत जिज्ञासा, आत्मविश्वास आणि उद्देशपूर्ण शिक्षणावर भर देण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी DPGU चे प्रो-चॅन्सलर डॉ. सोमनाथ पी. पाटील म्हणाले, "या नव्या उपक्रमांचे उद्घाटन केल्याबद्दल आम्ही चंद्रकांत (दादा) पाटील यांचे आभारी आहोत. भाषा आपली ओळख घडवते, संवाद आपल्याला अभिव्यक्तीची ताकद देतो, तर चिकित्सक विचार भविष्यातील दिशा दाखवतो. अभिजात मराठी भाषा अध्ययन केंद्र आणि नव्या विभागांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या मुळांशी जोडलेले राहतानाच जागतिक स्तरावरील संधींसाठी तयार व्हावे, हा आमचा उद्देश आहे. प्रश्न विचारण्याला प्रोत्साहन, विचारांचा सन्मान आणि जबाबदार नागरिक घडविणारे शिक्षण देण्यावर



आमचा भर आहे." अभिजात मराठी भाषा अध्ययन केंद्राच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक वारशाचा सखोल अभ्यास, संशोधन आणि संवर्धनाला चालना देण्यात येणार आहे. मीडिया अँड कम्युनिकेशन विभागात पत्रकारिता, प्रभावी कथनशैली, डिजिटल निर्मिती आणि जबाबदार माध्यम व्यवहार यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तर PPE विभागाच्या माध्यमातून तत्त्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्र या विषयांचा आंतरशाखीय अभ्यास करून विद्यार्थ्यांना सामाजिक व्यवस्था, प्रशासन, शासनपद्धती आणि समकालीन सार्वजनिक धोरणांचे चिकित्सक विश्लेषण करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम केले जाणार आहे.

चौलमध्ये ज्येष्ठांचा सन्मान, कर्तृत्वाचा गौरव आणि सामाजिक बांधिलकीचा जागर!

■ मुंबई(दै. संध्या)

अलिबागजवळील चौल-बेलाई येथे १२ नोव्हेंबर रोजी नारायण नाईक प्रतिष्ठान आणि उत्कर्ष महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठांचा सन्मान आणि 'समाजभान कार्यकर्तृत्व पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याची संधी मिळाली. नारायण नाईक प्रतिष्ठानचे विश्वस्त तथा नायब तहसीलदार प्रभाकर नाईक ऊर्फ तात्या नाईक यांच्या निमंत्रणावरून मी या कार्यक्रमाला गेले होते. सामाजिक कार्याच्या क्षेत्रात काम करताना तात्यांशी निर्माण झालेले आपुलकीचे नाते आणि सहभाव यामुळे या निमंत्रणाला माझ्यासाठी विशेष महत्त्व होते. कै. नारायण (भाऊ) नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित हा सोहळा अनेक अर्थांनी मनाला भावला.

नारायण नाईक म्हणजे आपल्या गावाशी आणि माणसांशी घट्ट नाते जोडलेले व्यक्तिमत्त्व. शेती करत असतानाच गावाच्या सार्वजनिक जीवनात सक्रिय सहभाग, ग्रामपंचायतीतील पंचवीस वर्षांचे योगदान, गावात शाळा आणि अंगणवाडी सुरू व्हावी यासाठी केलेले प्रयत्न, ज्येष्ठ नागरिक संघ तसेच सहकारी संस्थांमधील सहभाग अशा विविध माध्यमांतून भाऊंनी आपली सामाजिक बांधिलकी जपली. त्यांच्या स्मृती जिवंत ठेवतानाच त्यांनी जपलेली माणुसकी आणि समाजासाठी काम करण्याची वृत्ती पुढे नेण्याचा प्रयत्न त्यांचे कुटुंबीय नारायण नाईक प्रतिष्ठानच्या माध्यमातून करीत आहेत.

भाऊंनी आपल्या आयुष्यात गावासाठी, कुटुंबासाठी आणि समाजासाठी केलेल्या कार्यातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो. बदलाची सुरुवात आपल्या आजूबाजूच्या माणसांपासून होते. आपल्या क्षमतेनुसार,



आपल्या क्षेत्रात आणि परिसरात विधायक काम केले, तरी समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत आपला सहभाग नक्कीच नोंदवता येतो. एखाद्या माणसाचे आयुष्य संपते; मात्र त्याने निर्माण केलेली मूल्ये संपत नाहीत. त्याने जोडलेली माणसे, समाजासाठी केलेले काम आणि इतरांच्या आयुष्यात घडवलेला सकारात्मक बदल यांतून तो माणूस कायम जिवंत राहतो. नारायण नाईक यांच्या स्मृती जपण्याचा आणि त्यांचा सामाजिक वारसा पुढे नेण्याचा नाईक कुटुंबीयांचा प्रयत्न म्हणूनच कौतुकास्पद आहे.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पाच मान्यवरांचा गौरव करण्यात आला. अलिबाग येथील निवृत्त प्राध्यापक व लेखक शाम जोगळेकर यांना 'जीवनगौरव पुरस्कार', चौलचे शेतकरी रवींद्र गजानन पाटील यांना 'कृषिमित्र पुरस्कार', पाली येथील पत्रकार अमित आप्पा गवळे यांना 'लोकहितकारी पत्रकारिता पुरस्कार', नागाव येथील माऊली फाउंडेशनचे अध्यक्ष व पर्यावरणप्रेमी अतुल हेमंत गुरव यांना 'वृक्षमित्र राजाभाऊ राईलकर पर्यावरण स्नेही पुरस्कार', तर नांगरवाडी, रामराज येथील सामाजिक कार्यकर्त्या व महिला बचत गटाच्या समन्वयक प्रमिला शरद गावडे यांना 'समाजकार्य गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच चौल ज्येष्ठ नागरिक संघातील वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या तीस ज्येष्ठ सदस्यांचाही कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला.

ज्येष्ठ नागरिकांना अन्नधान्य किटचे वाटप करून भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी

जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेचा स्तुत्य उपक्रम; भिवंडी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांना दिला मदतीचा हात

■ भिवंडी(दै. संध्या)

धरती आबा, महान आदिवासी क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेच्या वतीने भिवंडी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांना मोफत अन्नधान्य किटचे वाटप करून जयंती सामाजिक बांधिलकी जपत साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन शिवसेना भिवंडी ग्रामीण विधानसभा प्रमुख तथा जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आणि आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणेचे अध्यक्ष महादेव घाटाळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत ज्येष्ठ नागरिकांना अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले.

भगवान बिरसा मुंडा हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी जननायक आणि महान क्रांतिकारक होते. त्यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलिहातू येथे झाला. ब्रिटिशांच्या अन्यायकारक राजवटीविरुद्ध, आदिवासींच्या जल-जंगल-जमिनीवरील हक्कांसाठी आणि त्यांच्या स्वाभिमानाच्या रक्षणासाठी त्यांनी संघर्ष केला. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने उलगुलान अर्थात महान उठाव घडवून आणला. अल्पायुष्यातही त्यांनी आदिवासी अस्मिता, स्वातंत्र्य आणि हक्कांच्या लढ्याला नवी दिशा दिली. त्यांच्या जयंतीदिनी ज्येष्ठ नागरिकांना मदतीचा हात देण्याचा संस्थेचा उपक्रम हा त्यांच्या



सामाजिक न्याय आणि समाजहिताच्या विचारांना अभिवादन करणारा ठरला.

या कार्यक्रमाला ट्रायबल फोरम, कोकण विभागाचे उपाध्यक्ष तथा आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणेचे उपाध्यक्ष सुनील झळके, पतसंस्थेचे संचालक अशोक भेकरे, सुरेश जाधव, भानुदास वाघ सर, चिंबिपाडा येथील माजी सरपंच लता डवला, शोभा जाधव, लाखिवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच परशुराम वरठा, प्रकाश राऊत, रमेश मुकणे, पोशा गायकर, सोनाळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच अनिल भेकरे, भिनार ग्रामपंचायतीचे सरपंच भरत घाटाळ, आदिम आधार पतसंस्थेचे व्यवस्थापक सूरज मानकर, अनिल जाधव, पद्माकर माळी, संतोष वडाली,राहुल लाडे, निवृत्ती कडव यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादन न करता समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना अन्नधान्याची मदत देण्याचा जनकल्याण आदिवासी सामाजिक संस्थेचा हा उपक्रम उपस्थितांकडून कौतुकास्पद ठरला.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



भजनी मंडळाला जयेश कंद सोशल फाउंडेशनकडून भजन साहित्य भेट

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

लोणीकंद गावातील पाटील वस्तीवरील भजनी मंडळासाठी हवेली तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष जयेश कंद यांच्या जयेश कंद सोशल फाउंडेशनच्या वतीने भजनासाठी आवश्यक असणारे टाळ, पखवाज आणि वीणा हे साहित्य भेट देण्यात आले. भक्तीमय परंपरा आणि वारकरी संप्रदायाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जतन करण्याबरोबरच भजन-कीर्तनाची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. समाजातील आध्यात्मिक, वैचारिक आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्यासाठी केवळ विचार मांडणे नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून योगदान देणे महत्त्वाचे आहे. दातृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व यांचा सुंदर संगम साधत वारजा कुटुंबाकडून सामाजिक व आध्यात्मिक परंपरा जपण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. भजन साहित्याच्या या भेटीमुळे पाटील वस्तीवरील भजनी मंडळाच्या धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार असून, वारकरी संप्रदायाची भक्तीपरंपरा अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.



आळंदी नगरपरिषदेत सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा किटचे वितरण

आळंदी : दैनिक संध्या

शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता जपण्याच्या उद्देशाने आळंदी नगरपरिषदेत घनकचरा व्यवस्थापन व सफाई सुरक्षा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगरपरिषदेतील सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांना वैयक्तिक सुरक्षा साधनांचे (पीपीई) किट वितरित करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत क्षमता बांधणी उपक्रम तसेच केंद्र शासनाच्या 'नमस्ते' योजनेंतर्गत नगरपरिषदेच्या सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या अनुषंगाने आयोजित या प्रशिक्षणात मे.कौटिल्य मल्टिक्रिएशन प्रा.लि. (मुंबई) या संस्थेच्या तज्ज्ञांनी सफाई कर्मचारी, मुकादम, घनकचरा विभागातील कर्मचारी तसेच नगरपरिषदेच्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. घनकचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन, स्वच्छतेच्या कामातील खबरदारी, वैयक्तिक आरोग्याची काळजी आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना याबाबत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. स्वच्छता कर्मचाऱ्यांना आधुनिक सुरक्षा साधनांचा योग्य वापर करता यावा आणि काम करताना त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होते असे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे , उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, यात्रा समिती सभापती पुजा घुंडरे, नगरसेवक दिनेश घुले यांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांना पीपीई सुरक्षा किटचे वितरण करण्यात आले. शहराच्या स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्याचे मान्यवरांनी कौतुक केले. याप्रसंगी नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि स्वच्छता विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आळंदीत जलाराम बाप्पा यांची २२७ वी जयंती उत्साहात साजरी

आळंदी : दैनिक संध्या

गुजरातचे संत श्री जलाराम बाप्पा यांची २२७ वी जयंती सोमवारी (ता. १६) आळंदीत धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरी करण्यात आली. बँडच्या तालावर निघालेली नगरप्रदक्षिणा, भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग, रक्तदान शिबिर आणि भक्तिमय कार्यक्रमांमुळे जयंती सोहळ्याला विशेष रंगत आली. जयंतीनिमित्त श्री जलाराम बाप्पा यांच्या प्रतिमेसह जलाराम सत्संग मंडळाचे माजी अध्यक्ष स्व.मगनभाई राजा यांच्या प्रतिमेची शहरातून नगरप्रदक्षिणा काढण्यात आली.

संत नामदेव महाराज सायकल वारी

१६० सायकल रायडर्सचा सहभाग

■ जेजुरी (दै. संध्या)

संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर ते श्रीक्षेत्र घुमाण (पंजाब) अशी सुमारे अडीच हजार किलोमीटरची सायकल वारी आयोजित करण्यात आली आहे. या वारीचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे होणार असून, रविवारी सकाळी ११ वाजता ही वारी जेजुरीत दाखल होणार आहे. या वारीत महाराष्ट्र व कर्नाटकातील सुमारे १६० सायकल रायडर्स सहभागी होणार असल्याची माहिती भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पालखी सोहळा पत्रकार संघ, भागवत धर्म प्रसारक मंडळ, श्री नामदेव दरबार कमिटी, सायकल रायडर्स असोसिएशन आणि समस्त नामदेव शिंपी समाज यांच्या वतीने २०२२ पासून या रथयात्रा व सायकल वारीचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा या उपक्रमाचे पाचवे वर्ष आहे.

महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा आणि पंजाब या पाच राज्यांतून प्रवास करत ही वारी १३ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र घुमाण येथे पोहोचणार आहे. तेथे सायकल वारीचा समारोप होईल. त्यानंतर रथयात्रा हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश या राज्यांतून प्रवास करून २१ डिसेंबर रोजी पंढरपूर येथे परतणार आहे.

सायकल वारीच्या माध्यमातून संत साहित्याचा प्रचार व प्रसार करण्याबरोबरच आरोग्य, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, प्रदूषण नियंत्रण आणि शिक्षण याविषयी जनजागृती करण्यात येणार असल्याचे भिसे यांनी सांगितले.



सकाळी उगवत्या सूर्याला महिलांकडून अर्ध्य देण्यात आले. उषा ही सूर्यदेवाची पत्नी मानली जाते, त्यामुळे याला " उषा अर्ध्य " असे म्हंटले जाते. ३६ तासांचा कडक (पाण्याशिवाय)उपवास सूर्यदयाच्या वेळी अर्ध्य दिल्यानंतर प्रसाद आणि पाणी ग्रहण करून महिलांनी उपवास सोडला,ज्याला आपण या विधीला पारण म्हणतो. कात्रज येथील जांभूळवाडी तलाव येथे घेतलेले फोटो.

दिवाळी संपताच शहरांकडे परतण्याची लगबग

■ नारायणगाव (दै. संध्या)



दिवाळीचा सण उत्साहात साजरा करून गावाकडील नातेवाइकांचा निरोप घेत चाकरमान्यांची पुन्हा शहरांकडे परतीची लगबग सुरू झाली आहे. दिवाळीच्या सुट्ट्या संपल्याने मुंबई, पुणे तसेच अन्य शहरांमध्ये नोकरी आणि व्यवसायानिमित्त राहणारे नागरिक कामावर परतू लागले आहेत. त्यामुळे रविवारी सकाळपासूनच आळेफाटा बसस्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. आळेफाटा हे अहिल्यानगर-कल्याण आणि नाशिक-पुणे या दोन प्रमुख महामार्गांच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने येथील बसस्थानकाला वाहतुकीच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. विविध शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांची येथे नेहमीच वर्दळ असते. दिवाळीनंतर परतीचा प्रवास सुरू झाल्याने बसस्थानक परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते. दिवाळीनिमित्त काही दिवस शहरातील धावपळ बाजूला ठेवून चाकरमानी आपल्या गावी आले होते. कुटुंबीयांसोबत सण साजरा करणे, आईच्या हातचे दिवाळीचे पदार्थ चाखणे, नातेवाइकांच्या भेटीगाठी घेणे अशा आनंददायी क्षणांमध्ये त्यांची सुट्टी गेली. मात्र, सुट्ट्या संपल्याने पुन्हा कामाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांना शहराकडे रवाना व्हावे लागत आहे. बसस्थानकावर लहान मुलांसह कुटुंबीय, हातात सामानाच्या पिशव्या आणि गाव सोडण्याची हुरहूर मनात घेऊन प्रवासी बसची प्रतीक्षा करताना दिसत होते. मुंबई आणि पुण्याकडे जाणाऱ्या बसमध्ये जागा मिळविण्यासाठी प्रवाशांची धावपळ सुरू होती. काही दिवसांपूर्वी चाकरमान्यांच्या उपस्थितीने गजबजलेली घरे आता पुन्हा शांत होणार असल्याने गावाकडे राहणाऱ्या नातेवाइकांमध्येही भावुक वातावरण होते.

दिवाळीचा गोडवा आणि गावाकडच्या आठवणी मनात साठवून चाकरमान्यांचा पुन्हा शहरांकडे प्रवास सुरू झाला आहे. प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने मुंबई, पुणे आणि अन्य प्रमुख मार्गांवर जादा बसफेऱ्यांचे नियोजन करावे, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

शिरूरच्या कायदा-सुव्यवस्थेची पोलीस महासंचालकांकडून गंभीर दखल

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील वाढती गुन्हेगारी, गोळीबार, अवैध धंदे, अमली पदार्थांची समस्या, महिला व अल्पवयीन मुलींची सुरक्षितता तसेच सामाजिक कार्यकर्त्यांच्या संरक्षणा संदर्भातील गंभीर प्रश्नांची महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी दखल घेतली आहे. सामाजिक कार्यकर्ते व व्हिसलब्लोअर निलेश मंदा यशवंत वाळुंज, घोडनदी बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. उदय सरोदे आणि ॲड. राहुल वाघचौरे यांनी मुंबई येथे पोलीस महासंचालकांची नुकतीच भेट घेऊन शिरूर तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती मांडली. या भेटीदरम्यान मांडण्यात आलेल्या विविध मुद्द्यांची दखल घेत पोलीस महासंचालकांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांना शिरूर तालुक्यातील परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक सुधारणा व प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच यासंदर्भातील अहवाल सहा आठवड्यांत सादर करण्यास सांगितले आहे. पोलीस प्रशासनातील उत्तरदायित्व, निष्पक्ष तपास, सक्षम पोलीस नेतृत्व आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या सुरक्षिततेचे मुद्देही यावेळी उपस्थित करण्यात आले. आता शिरूर तालुक्यात पोलीस प्रशासनात नेमके कोणते बदल होणार, गुन्हेगारीवर आळा बसणार का आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी



■ पुणे (दै. संध्या)

नेपाळमधील चितवन जिल्ह्यातील सौराहा येथे आयोजित पहिल्या सौराहा ओपन आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत पुण्यातील भोसलेज तायक्वांदो आणि योधी तायक्वांदोच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. भारतीय खेळाडूंनी आपल्या कौशल्याच्या जोरावर दोन सुवर्ण, तीन रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण सहा पदके पटकावत आंतरराष्ट्रीय स्तरावर पुण्याचा नावलौकिक उंचावला. या स्पर्धेसाठी भारतीय संघाचे नेतृत्व ग्रँडमास्टर चंद्रकांत भोसले यांनी केले. त्यांना मास्टर राजेश पुजारी, मास्टर भार्गव भोसले आणि मास्टर स्वाती खुर्जेकर यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंनी आत्मविश्वास, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देत उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन केले. पदक विजेत्यांमध्ये वेदिका राजेश पुजारी आणि झेना सहनी यांनी सुवर्णपदक पटकावले. देवकी किरण परदेशी, यश गुल्लापल्ली आणि अमेय शिंदे यांनी रौप्यपदक, तर निखिल सागर दामले याने कांस्यपदक मिळवले. या यशामुळे पुण्यातील खेळाडूंच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रातील क्षमतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. या स्पर्धेमुळे पुण्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर कौशल्य सिद्ध करण्याची तसेच विविध देशांतील खेळाडूंसोबत स्पर्धात्मक अनुभव घेण्याची संधी मिळाली. तायक्वांदो खेळाचा प्रसार आणि दर्जेदार खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने हे यश महत्त्वपूर्ण असल्याची भावना ग्रँडमास्टर चंद्रकांत भोसले आणि मास्टर राजेश पुजारी यांनी व्यक्त केली.



वासुकी बॉईजने उत्कृष्ट खेळी करत जिंकला मल्हार चषक

■ जेजुरी (दै. संध्या)

पुरंदर प्रीमियर क्रिकेट लीग

सांस्कृतिक राजधानी असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत एस आर आर फाउंडेशन आयोजित पुरंदर प्रीमियर क्रिकेट लीगच्या स्पर्धेत महेश उबाळे स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वासुकी बॉईज जेजुरी संघाने ही स्पर्धा जिंकून मल्हार चषक जिंकला. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडाच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तलावाच्या काठी असलेल्या पालखी मैदानात एस आर आर क्रिकेट फाउंडेशनच्या वतीने सलग दुसऱ्या वर्षी पुरंदर प्रीमियर लीग - मल्हार चषकाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत बारा संघ सहभागी झाले होते. पाच दिवसात दिवस रात्र पद्धतीचे 36 सामने खेळवले गेले. आयकॉन आणि आयडॉल खेळाडूंबरोबरच स्थानिक खेळाडूंनी उत्कृष्ट खेळी करत क्रिकेट रसिकांची मने जिंकली. या स्पर्धेत सर्वच सामन्यात उत्कृष्ट खेळी करत महेश स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वासुकी बॉईज जेजुरी संघाने प्रथम क्रमांकाचा मल्हार चषक पटकाविला. या संघास रोख बक्षीस, चषक तसेच संघ मालकास दुचाकी गाडी देऊन सन्मानित करण्यात आले. नाथसाहेब कडेपठार एलेव्हन संघाने द्वितीय, प्रेम इलेव्हन हिवरे संघाने तृतीय , तर राजगड योद्धा जेजुरी संघाने चतुर्थ क्रमांक पटकाविला. सर्व विजयी संघाना चषक व रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट फलंदाज निखिल चव्हाण - राहू , उत्कृष्ट गोलंदाज कमलेश राऊत जेजुरी, सामन्याचा मानकरी पुरस्कार अक्षय तावरे मोरगाव, व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक चेतक गोरे सोलापूर यांना चषक देऊन सन्मानित करण्यात आले. पंच म्हणून स्वप्नील काकडे, अक्षय चांदगुडे, तुषार मेटे, तर उत्कृष्ट समालोचन विजय साकोरे, संदीप ओव्हाळ, व सलीम यांनी काम पाहिले. या सामन्यांचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. दररोज 75 हजारहून अधिक रसिकांनी ही लाईव्ह सामने पाहिले. तर हजारो क्रिकेट रसिकांनी मैदानावर हजेरी लावली होती. जेजुरी एस आर आर फाउंडेशनच्या वतीने या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केले होते.

गुरुजींच्या शाळेसाठी माजी विद्यार्थ्यांची मोठी भेट; पुरंदरमध्ये पाडव्याला दातृत्वाचा जागर!

गावोगावी भरले स्नेहमेळावे; दोनशे अकरा शाळांसाठी तेवीस लाखांहून अधिक मदत, ग्रामीण शिक्षणाला लोकसहभागाचे बळ

■ नाझरे सुपे पुरंदर (दै. संध्या)



एकेकाळी ज्या शाळेच्या वर्गखोल्यांमध्ये बसून शिक्षणाचे धडे गिरवले, ज्या शिक्षकांनी आयुष्याला दिशा दिली, त्याच शाळेच्या प्रगतीसाठी पुरंदर तालुक्यातील माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला आहे. दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी मेळाव्यांनी यंदा केवळ स्नेहसंमेलनाचे स्वरूप न ठेवता शाळांच्या विकासासाठी लोकचळवळीचे रूप धारण केले. शाळांशी असलेली नाळ जपत माजी विद्यार्थ्यांनी तब्बल तेवीस लाख पाच हजार चारशे अठ्ठावन्न रुपयांचे योगदान दिले.

तालुक्यातील दोनशे अकरा शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. चार हजार चौसष्ट माजी विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. जुन्या मित्रांच्या भेटी, शिक्षकांशी संवाद आणि शालेय आठवणींना उजाळा देतानाच अनेकांनी आपल्या शाळेला आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे शाळांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी समाजातील घटक एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या उपक्रमात रोख रकमेपेक्षा प्रत्यक्ष उपयोगी साहित्य देण्यावर माजी विद्यार्थ्यांनी भर दिला. एकूण मदतीपैकी एकोणीस लाख ब्याण्णव हजार पाचशे चौपन्न रुपयांची मदत वस्तुरूपाने मिळाली. रोख स्वरूपात दोन लाख एकोणतीस हजार एकाहत्तर रुपये, तर इतर स्वरूपात त्र्याऐंशी हजार आठशे तेहतीस रुपयांचे योगदान मिळाले. संगणक, सीसीटीव्ही यंत्रणा, वह्या, दप्तर, प्रथमोपचार साहित्य अशा विविध वस्तू शाळांना देण्यात आल्या.

जेजुरी येथील जिल्हा परिषद शाळा क्रमांक दोनला मिळालेली मदत विशेष उल्लेखनीय ठरली. या शाळेसाठी चार लाख शहात्तर हजार नऊशे पंचेचाळीस रुपयांचे योगदान देण्यात आले. नऊ संगणक संचांसाठी तीन लाख साठ हजार पाचशे रुपये, चार स्क्रीनसह सीसीटीव्ही यंत्रणेसाठी पन्नास हजार रुपये, प्रथमोपचार पेटीसाठी पंधरा हजार रुपये, विद्यार्थ्यांच्या दप्तर संचासाठी एकोणचाळीस हजार रुपये आणि एकाहत्तर विद्यार्थ्यांना वह्या देण्यासाठी बारा हजार चारशे पंचेचाळीस रुपये खर्च करण्यात आले. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची साधने उपलब्ध होणार आहेत. केंद्रनिहाय मदतीच्या आकडेवारीत ढालेवाडी केंद्राने पाच लाख चौपन्न हजार चारशे चौपन्न रुपयांची वस्तुरूप मदत देत आघाडी घेतली. नीरा केंद्राने तीन लाख एकोणसत्तर हजार रुपये, तर नाझरे सुपे केंद्राने एक लाख एकाहत्तर हजार रुपयांचे योगदान दिले. भिवडी केंद्रातून रोख स्वरूपात एक लाख दहा हजार शंभर रुपयांची मदत जमा झाली. या योगदानामुळे विविध शाळांना त्यांच्या गरजेनुसार सुविधा उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा झाला.

माजी विद्यार्थी मेळाव्यांना मिळालेला प्रतिसादही लक्षवेधी ठरला. वाल्हे येथे चारशे वीस माजी विद्यार्थी उपस्थित राहिले. माहूर केंद्रातील शिंदेवाडी येथे दोनशे जणांनी सहभाग घेतला. वाल्हे येथे त्र्याण्णव, भोरवाडी येथे पासष्ट, बोपगाव आणि राख येथे प्रत्येकी एकसष्ट, तर भिवरी येथे त्रेपन्न माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्यात आली. अनेक वर्षांनंतर शाळेच्या परिसरात एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांशी संवाद साधला आणि शाळेच्या विकासासाठी पुढेही सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.

भिवडी, चांबळी, ढालेवाडी, दिवे, गराडे, काळदरी, माहूर, नाझरे सुपे, नीरा, पिलाणवाडी, पिसुर्वे, राजेवाडी, राजुरी, राख, सुपे खुर्द, वाल्हे, वलुंज आणि वीर यांसह विविध केंद्रांतील शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. प्रत्येक गावात स्थानिक गरजांचा विचार करून मदत देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमातून शाळेचे माजी विद्यार्थी हे केवळ शाळेच्या आठवणी जपणारे नसून तिच्या विकासात प्रत्यक्ष योगदान देणारे घटक ठरू शकतात, हे स्पष्ट झाले. शाळांमध्ये आवश्यक सुविधा निर्माण करणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे आणि शिक्षणासाठी पूरक वातावरण तयार करणे, या उद्देशाने माजी विद्यार्थ्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे मानले जात आहे.

शिक्षण विभागातील अधिकारी राजकुमार बामणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुरंदर तालुक्यातील या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला. माजी विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्या सहभागातून शाळांच्या विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

पाडव्याच्या निमित्ताने झालेल्या या उपक्रमाने पुरंदरमधील शाळांना आर्थिक आणि शैक्षणिक बळ देण्याबरोबरच सामाजिक बांधिलकीची जाणीवही अधोरेखित केली. आपल्या शाळेने दिलेल्या शिक्षणाची परतफेड पुढील पिढीच्या शिक्षणासाठी योगदान देऊन करण्याचा माजी विद्यार्थ्यांचा हा प्रयत्न ग्रामीण शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे.